# कोकणवासीयांसाठी खूशखबर! मुंबई ते वेंगुर्ले रो-रो सेवेला वेग



**कणकवली :** मुंबई ते वेंगुर्ले रो-रो सेवा सुरू करण्यासाठी राज्य शासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. मालवण आणि वेंगुर्ले येथे थांबे प्रस्तावित असून सेवा चालवण्यासाठी चार कंपन्यांनी उत्सुकता दर्शवली आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाकडून मुंबई-विजयदुर्ग-वेंगुर्ला मार्गाच्या व्यवहार्यतेची तपासणी सुरू असून लवकरच निविदा प्रक्रिया राबवून वर्षभरात सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. १९८८ मध्ये बंद झालेली मुंबई-कोकण जलवाहतूक सेवा पुन्हा सुरू झाल्यास गणेशोत्सव, शिमग्यासारख्या सणांना कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांना अवघ्या सात-आठ तासांत कोकणात पोहचणे शक्य होणार आहे. सध्या रेल्वे आणि एसटीच्या अतिरिक्त फेऱ्याही अपुऱ्या पडत असल्याने जलमार्ग हा जलद आणि त्रासमुक्त पर्याय ठरणार आहे. तिकीट दर आवाक्यात राहिल्यास या स्वप्नाला मूर्त रूप येणार आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ६०
www.ramprahar.com

◆ बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


मातृत्वाला सन्मान; 'हिरकणी कक्षां'ची साथ!/ २

माणगावात दीड दिवसांच्या गणरायांचे विसर्जन/ ५

गणेशोत्सव दर्शन छायाचित्रे /३,६,८


# ऊस उत्पादकांना दिलासा

## राज्य मंत्रिमंडळात सात मोठे निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. १५) मंत्रालयात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ऊस उत्पादक शेतकरी आणि सहकारी साखर कारखानदारीला मोठा दिलासा देणारे सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्यातील अनेक सहकारी साखर कारखाने आर्थिक अडचणीत असून शेतकऱ्यांची थकीत एफआरपी हा गेल्या काही महिन्यांपासून चर्चेचा विषय होता. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाने २०२५-२६च्या गाळप हंगामातील थकीत एफआरपी तातडीने अदा करण्यासाठी आणि आगामी २०२६-२७ च्या हंगामाची तयारी करण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून कारखानदारीला चालना मिळणार आहे. याशिवाय शासनाच्या कारभारात अधिक पारदर्शकता आणि गुणवत्ता आणण्यासाठी २५ प्रमुख धोरणे आणि २५ लोककल्याणकारी योजनांचे वैज्ञानिक पद्धतीने मूल्यांकन करण्यासाठी 'महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक)' स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. आयआयएम मुंबईच्या शिफारशीनुसार हा एक वर्षाचा प्रकल्प राबवला जाणार आहे.

इतर निर्णयांमध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक शाखेला वाचनालयासाठी मुद्रांक शुल्क माफ, आर्वी नगरपरिषदेला व्यापारी संकुलासाठी ६२४० चौ.मी. जमीन विनामूल्य, हरेगाव येथील शेती महामंडळाची जमीन मूळ मालकांना परत करण्यासाठी कायद्यात सुधारणा आणि मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिपसाठी चार नवीन पदांना मंजुरी देण्यात आली आहे.

# रायगडात दीड दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि. १५) दीड दिवसांच्या गणपती बाप्पांना उत्साहात तसेच जड अंतकरणाने निरोप देण्यात आला. जिल्ह्यात १२ सार्वजनिक, तर २५ हजारांहून अधिक खासगी दीड दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

दुपारी ४ वाजल्यानंतर विसर्जन मिरवणुका सुरू झाल्या. पारंपरिक खालूबाजा आणि ढोल-ताशाच्या तालावर ठेका धरत लहानथोर मंडळी, महिला गुलाल उधळत मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या. पारंपारिक लेझीम नृत्य सुरू होते. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, असा जयघोष सुरू होता. नदी, तलाव, समुद्र, विहिरी, ओढे या ठिकाणी गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यादरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

गणरायांचे सोमवारी रायगड जिल्ह्यात मोठ्या जल्लोषात आगमन झाले. सकाळच्या सुमारास अधूनमधून पावसाच्या हलक्या सरींचे विघ्न येत होते, मात्र गणेशभक्तांचा उत्साह तसूभरही कमी झाला नव्हता. जिल्ह्यात एक लाख पाच हजार ५४ घरगुती, तर २९१ सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. आपल्या लाडक्या गणरायाला मखरात बसवून त्याची विधिवत, षोडशोपचारे पूजाअर्चा करण्यात आली. गणरायाच्या सेवेत कुठलीही कमतरता राहू नये यासाठी गणेशभक्त काळजी घेत होते, तर पूजेसाठी मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याने वेळ साधताना भटजी मंडळींना कसरत करावी लागत होती.

मुंबईकर गणेशभक्त गावागावात मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. त्यामुळे एरव्ही शांत असलेल्या गावांना जाग आली असून गावागावांमध्ये वर्दळ पाहायला मिळत आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी बाप्पाची प्रतिष्ठापना उत्साहात पार पडली. धार्मिक विधी, मंत्रोच्चाराच्या जयघोषात सिद्धार्थ ठाकूर व त्यांच्या पत्नी पूर्वा ठाकूर यांच्या हस्ते गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, छाया ठाकूर, भरतशेठ ठाकूर, रजनी ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा ठाकूर, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, अर्चना ठाकूर, विशालशेठ ठाकूर, भूषण ठाकूर, पूनम ठाकूर, प्रतीक ठाकूर, योगिता ठाकूर, भारत ठाकूर, प्राप्ती ठाकूर, अमोघ ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर यांनी बाप्पाची मनोभावे पूजाआरती करून दर्शन घेतले.**



# वाशीतील राजभाषा संमेलनाचे अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन

## हिंदीच्या तंत्रज्ञानयुक्त उपक्रमांचे लोकार्पण



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात १४ आणि १५ सप्टेंबर रोजी आयोजित ६व्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत झाले. गणेशोत्सवाच्या आणि हिंदी दिवसाच्या मुहूर्तावर आयोजित या दोन दिवसीय संमेलनात देशभरातून सुमारे सात हजार प्रतिनिधी, साहित्यिक, राजभाषा अधिकारी आणि शिक्षणतज्ज्ञ सहभागी झाले होते.

या सोहळ्यात मंत्री अमित शाह यांच्या हस्ते तंत्रज्ञान क्षेत्रातील महत्त्वाच्या उपक्रमांचे लोकार्पण करण्यात आले. यात जलद भाषांतरासाठी मदत करणारे भारती हे मोबाईल अ‍ॅप, नवीन हिंदी शब्दकोश आणि पुण्यात उभारण्यात आलेल्या भाषा डेटा सेंटरचा समावेश आहे. याशिवाय राजभाषेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींना राजभाषा गौरव आणि राजभाषा कीर्ती पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. आपल्या संबोधनात अमित शाह यांनी देशाच्या बहुभाषिक संस्कृतीचा गौरव केला. स्वराज्य, स्वधर्म आणि स्वभाषेची संकल्पना मांडणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीला त्यांनी नमन केले.

मराठी भाषेचा आदर राखत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याचा उल्लेख त्यांनी यावेळी केला.

# प्रवाशांना दिलासा; बसमध्येच होणार एनसीएमसी कार्ड रिचार्ज

**मुंबई** : महिला व ज्येष्ठांसाठी एसटी प्रवासातील सवलतीसाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य केल्यानंतर येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी एसटी महामंडळाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता प्रवाशांना कार्डचे टॉपअप रिचार्ज वाहकाकडूनच बसमध्ये करता येणार आहे. १ सप्टेंबरपासून सवलतीसाठी एनसीएमसी कार्ड बंधनकारक करण्यात आले, मात्र बॅलन्स नसल्याने अनेकांना पूर्ण तिकीट काढावे लागत होते, तर काहींना रिचार्जसाठी डेपोत रांगा लावाव्या लागत होत्या. आता या सुविधेमुळे रिचार्जची धावपळ, रांगा हा त्रास संपणार असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

## निवडक

### छ. संभाजीनगरमध्ये मिरवणुकीत कंटेनर घुसून दोघांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर येथील पिंप्रीराजा गावात चितेपिंपळगाव-कर्माड मार्गावर गणेश मिरवणुकीत कंटेनर घुसून मोठा अपघात घडला. या अपघातात विठ्ठल जाधव (४९) आणि रमेश बनसोडे (४५) यांचा मृत्यू, तर सात वर्षांच्या मुलासह १२ जण जखमी झाले आहेत. दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. चालकाचे नियंत्रण सुटून कंटेनर गतिरोधक आणि दुचाकीला धडकला.

### भारताचा नेपाळला मदतीचा हात; दररोज १८ तास देणार वीज

**काठमांडू :** नेपाळमधील महापुरात पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान होऊन जलविद्युत सुविधांनाही फटका बसला. या पार्श्वभूमीवर नेपाळला वीज निर्यात करण्यास भारत सरकारने मंजुरी दिली. वीज मंत्रालयानुसार १३ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत नेपाळ वीज प्राधिकरणाला दररोज १८ तास वीज निर्यात करण्यास मान्यता देण्यात आली आहे. नेपाळला सहकार्य करण्याच तसेच ऊर्जा क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य बळकटीसाठी भारत कटिबद्ध आहे.

# बोगस डॉक्टरांना चाप

## राज्यातील सर्व डॉक्टरांना क्यूआर कोड बंधनकारक

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील बोगस डॉक्टरांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील प्रत्येक नोंदणीकृत डॉक्टरला त्यांच्या दवाखान्यात आणि रुग्णालयात 'क्यूआर कोड' असलेला नामफलक लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रणालीची ऑक्टोबरअखेर अंमलबजावणी होणार आहे.



या क्यूआर कोडमुळे रुग्णांना डॉक्टरांची नोंदणी, शैक्षणिक पात्रता आणि परवान्याची वैधता याची अचूक माहिती मिळणार आहे. उपचारासाठी आलेल्या कोणत्याही रुग्णाला मोबाइलवर कोड स्कॅन करून डॉक्टरचे नाव, नोंदणी क्रमांक आणि पात्रतेची माहिती तपासता येणार आहे. त्यामुळे बनावट डॉक्टरांवर चाप बसणार आहे. हा नामफलक दर्शनी भागात लावणे बंधनकारक असणार आहे.

डॉक्टर एकापेक्षा जास्त ठिकाणी सेवा देत असतील तर प्रत्येक ठिकाणी वेगळा क्यूआर कोड घ्यावा लागणार आहे. राज्य सरकारने नोव्हेंबर २०२५मध्ये 'केवायडी' (नो युवर डॉक्टर) उपक्रमाद्वारे सुमारे १० हजार डॉक्टरांची नोंदणी केली आहे. एमएमसीने डॉक्टरांना www.kyd.co.in या संकेतस्थळावर नोंदणी बंधनकारक केली असून त्यानंतरच त्यांना क्यूआर कोड दिला जातो, अशी माहिती परिषदेचे प्रशासक विंकी रुघवानी यांनी दिली.

# फ्रिजच्या स्फोटाने एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**बेळगाव : वृत्तसंस्था**



गणेश चतुर्थीच्या रात्री बेळगावमधील चव्हाट गल्लीत काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली. एका घराला व दुकानाला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील चौघांचा होरपळून मृत्यू झाला, तर दोघी गंभीर जखमी झाल्या. दमोने कुटुंबाच्या घरात मध्यरात्री अचानक आगीच्या ज्वाळा उसळल्या.

काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. यात गजानन दमोने (६५), शारदा दमोने (४५), भारती दमोने (५०) व रोशन दमोने (२१) यांचा जागीच मृत्यू झाला. प्रिया दमोने (२८) व गंगा दमोने (२५) या दोघी जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. फ्रिजचा स्फोट झाल्याने आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबावर कोसळलेल्या दु:खामुळे परिसर सुन्न झाला आहे. मार्केट पोलीस आणि अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणली असून अधिक तपास सुरू आहे.

# राजस्थानमधील तरुणांचा राजकीय वापर काँग्रेसला भोवला -महसूलमंत्री बावनकुळे

**मुंबई : प्रतिनिधी**



राजस्थानमधील तरुणांचा राजकीय वापर करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न जनतेने हाणून पाडला असून 'वंदे मातरम' पूर्ण म्हणणार नाही, अशी भूमिका घेणाऱ्या काँग्रेसला जनतेने धडा शिकवला, असे मत राजस्थान महापालिका प्रभारी व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (दि. १५) व्यक्त केले.

राजस्थानच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपने मुसंडी घेतली. त्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील विकसित भारताच्या संकल्पावर जनतेने विश्वास व्यक्त केला आहे. राजस्थानमधील तरुणांनी चुकीच्या राजकारणाला नकार देत मोदी आणि विकसित भारताच्या बाजूने कौल दिला. राजस्थानमध्ये ३१८ नगरपालिका, नगरपरिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या.





**गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर दैनिक रामप्रहर घेऊन येत आहे सर्व गणेशभक्तांसाठी एक सुवर्णसंधी!**

**आपल्या लाडक्या बाप्पाचे मनमोहक रूप आता सगळ्यांना पाहूद्या...**

**२४ सप्टेंबरपर्यंत घरगुती आणि सार्वजनिक मंडळांच्या गणरायाचे फोटो 'रामप्रहर'मध्ये विनामूल्य प्रसिद्ध केले जाणार आहेत.**

**बाप्पाचा फोटो इथे पाठवा**

**ई-मेल आयडी : ramprahar@gmail.com**

**व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक : ७७३८१०६००९**

**फोटोसोबत खालील माहिती नक्की पाठवा**

- घरगुती गणपती असल्यास : कुटुंबप्रमुखाचे नाव आणि संपूर्ण पत्ता
- सार्वजनिक गणपती असल्यास : मंडळाचे नाव आणि पत्ता

चला तर मग या गणेशोत्सवात तुमच्या बाप्पाचा सुंदर फोटो आणि माहिती आमच्यापर्यंत पोहचवा आणि आपल्या बाप्पाचे रूप सर्वांपर्यंत घेऊन जा...

**दैनिक रामप्रहर : सदैव तुमच्या सोबत!**


# खनिज चोरांवर आता डिजिटल वॉच!

## महाखनिज २.० प्रणालीचे लोकार्पण



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील गौण खनिजांचे उत्खनन, वाहतूक, परवाना आणि देखरेख प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्यासाठी महसूल विभागाने तयार केलेल्या 'महाखनिज २.०' या अत्याधुनिक डिजिटल प्रणालीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आले.

गौण खनिजांच्या व्यवस्थापनाची पारंपरिक प्रक्रिया ही मोठ्या प्रमाणात कागदी व मानवी हस्तक्षेपाची असल्याने त्यात देखरेख ठेवताना अनेक अडचणी येत होत्या. त्यावर मात करत गौण खनिज प्रशासनाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे प्रशासनात डिजिटल क्रांती घडून येत आहे. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी याबद्दलचे सादरीकरण केले. यावेळी कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सहसचिव मनीषा जयभाये, रेलटेल कंपनीचे प्रमुख विनोद अग्रवाल आणि कोकण सहआयुक्त रवींद्र पवार उपस्थित होते.

'महाखनिज' प्रणालीच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांत राज्य शासनाच्या तिजोरीत सुमारे १६,००० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. आता 'महाखनिज २.०' या नवीन व प्रगत आवृत्तीच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत २५,००० कोटी रुपयांचे महसूल संकलनाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# स्त्री-भ्रूणहत्येला बसणार आळा

## महाराष्ट्रात राज्यस्तरीय कृती दलाची स्थापना

**मुंबई : प्रतिनिधी**



बेकायदा गर्भलिंग निदान, स्त्रीभ्रूणहत्या आणि बेकायदा गर्भपाताला आळा घालण्यासाठी राज्य शासनाने राज्यस्तरीय कृती दल स्थापनेला मान्यता दिली आहे. पीसीपीएनडीटी आणि एमटीपी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हे दल जिल्हा आणि महापालिका क्षेत्रांना भेटी देऊन पाहणी करणार आहे. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली हे दल स्थापन झाले असून यात प्रज्ञा सातव, भावना गवळी, चित्रा वाघ, उमा खापरे, मनीषा कायंदे, स्नेहा दुबे-पंडित आणि श्वेता महाले यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे हे सदस्य सचिव असतील. हे कृती दल जिल्हा शल्यचिकित्सक, महापालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांसह सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांना अचानक भेटी देऊन कायद्याच्या तरतुदींचे पालन होते का, याची खातरजमा करणार आहे. उल्लंघन आढळल्यास कारवाईचे निर्देश देण्याचे अधिकार दलाला असतील. अंमलबजावणीतील त्रुटींचा आढावा घेऊन शासनाला शिफारशी आणि जनजागृतीचे उपाय सुचवले जातील. दर तीन महिन्यांनी अहवाल सार्वजनिक आरोग्य विभागाला सादर करणे बंधनकारक असून दलाचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल.

# मातृत्वाला सन्मान, 'हिरकणी कक्षा'ची साथ!

## राज्यभरात एसटी बसस्थानकांवर १२५ हिरकणी कक्ष उभारणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लाखो महिला प्रवाशांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि सन्मानाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने म (एसटी) टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेडसोबत १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा महत्त्वपूर्ण करार संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिलांना, विशेषतः स्तनदा मातांना, प्रवासादरम्यान आपल्या बाळाची काळजी घेण्यासाठी स्वच्छ, सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत. एसटीच्या बसस्थानकांवर मातृत्वाला आवश्यक असलेली संवेदनशीलता आणि सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



या प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड (TKM) आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमांतर्गत सहकार्य करणार आहे. सामंजस्य करारानुसार राज्यातील एसटी बसस्थानकांवर अंदाजे ३ मीटर ३ मीटर आकाराचे प्री-फॅब्रिकेटेड 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत.

या कक्षांमध्ये मातांना स्तनपानासह बाळाची निगा राखण्यासाठी आवश्यक अशी सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासोबतच आवश्यक फर्निचर, फिक्स्चर, अंतर्गत वायरिंग, विद्युतीकरण तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्य यांचाही समावेश प्रकल्पात करण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी एसटी महामंडळाकडून सुमारे ५ मीटर ५ मीटर जागा उपलब्ध करून देणे, आवश्यक वीज, पाणी आणि स्थापनेसाठी सहकार्य करणे तसेच आवश्यक शासकीय परवानग्या मिळविणे अपेक्षित आहे. प्रकल्प पूर्ण होऊन साहित्य व सुविधा महामंडळाकडे हस्तांतरित झाल्यानंतर कक्षांचे संचालन, सुरक्षा, दुरुस्ती, देखभाल आणि देखरेख करण्याची संपूर्ण जबाबदारी एसटीची राहणार आहे. विशेष म्हणजे, MOU मध्ये या प्रकल्पासाठी एसटीकडून कोणतेही आर्थिक योगदान राहणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. टोयोटा किर्लोस्करच्या CSR उपक्रमातून हा प्रकल्प राबविला जाणार आहे.

'हिरकणी कक्ष' हा केवळ एक सुविधा प्रकल्प नसून मातृत्वाचा सन्मान, महिलांच्या गरजांची जाणीव आणि प्रवासी-केंद्रित एसटी व्यवस्थेच्या दिशेने टाकलेले संवेदनशील पाऊल ठरणार आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

**तीन वर्षांत १२५ कक्ष उभारण्याचे नियोजन**

MOU मधील नियोजनानुसार तीन आर्थिक वर्षांत एकूण १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

२०२६-२७ : ५० कक्ष
२०२७-२८ : ५० कक्ष
२०२८-२९ : २५ कक्ष

CSR धोरण, उपलब्ध जागा आणि स्थानिक गरजेनुसार या संख्येत आवश्यकतेनुसार बदल करण्याची तरतूदही करारात करण्यात आली आहे.

# नऊ हजारांपेक्षा अधिक दीड दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलसह खारघर, कामोठे, तळोजा, खांदा कॉलनी, नवीन पनवेल आणि ग्रामीण भागातील ९००० पेक्षा अधिक दीड दिवसांच्या गणपती बाप्पांचे विसर्जन मोठया दिमाखात आणि उत्साही वातावरणात १५ सप्टेंबर रोजी करण्यात आले. यावेळी अनेकांना आपले अश्रू लपवता आले नाहीत.

ढोल-ताशांचा गजर, लेझीमच्या तालावर नाचणारे गणेशभक्त आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात दीड दिवसांच्या गणरायाला निरोप देण्यात आला. अनेक गणेशभक्तांनी पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढत बाप्पाला विसर्जनस्थळी नेले. काही ठिकाणी महिलांनी आणि लहान मुलांनीही मोठ्या उत्साहाने विसर्जन सोहळ्यात सहभाग घेतला.



विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि पोलिसांकडून विविध विसर्जनस्थळांवर बंदोबस्त ठेवण्यात आला होता. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन काही ठिकाणच्या वाहतूक व्यवस्थेतही बदल करण्यात आले.

कृत्रिम तलाव तसेच नैसर्गिक विसर्जनस्थळी गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. बाप्पाला निरोप देताना अनेक गणेशभक्त भावूक झाले. मात्र, पुढील दिवसांत देखील अनेक गणेशमूर्तींचे विसर्जन होणार असल्याने गणेशोत्सवाचा उत्साह कायम राहणार आहे.

ग्रामीण भागात आजही नदीमध्ये गणपती विसर्जन केले जाते. यावेळी भजन, कीर्तन सुरू असतात. टाळ मृदंगाच्या गजरात बाप्पाला डोक्यावर घेऊन मिरवणूक काढली जाते. अनेक गावांमध्ये एकत्र गणपती बाप्पा विसर्जनासाठी काढण्याची परंपरा अजून ही कायम आहे.

यावेळी लहान मोठे सर्वजण या मिरवणूकीत सहभागी होतात. आणि बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी होतात. त्यानंतर सार्वजनिक आरती घेतली जाते. आणि बाप्पांचे नदीमध्ये विसर्जन केले जाते.

# मोहोपाड्यात वाजतगाजत विसर्जन

## ■ 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा गावातील दीड दिवसांच्या गणरायाला भक्तिमय वातावरणात वाजतगाजत आणि भजनाच्या तालावर भावपूर्ण निरोप देण्यात आला. गणेश विसर्जनासाठी सकाळपासूनच भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.दुपारी चार नंतर ढोल-ताशांचा गजर, भजन-कीर्तन आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात बाप्पाच्या मूर्ती विसर्जनासाठी नेण्यात आल्या.

दीड दिवस गणरायाची मनोभावे पूजा-अर्चा केल्यानंतर लाडक्या बाप्पाला निरोप देताना ज्येष्ठ नागरिकांपासून लहान मुलांपर्यंत अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. भक्तिभाव आणि भावनिक वातावरणात गणरायाला निरोप देण्यात आला.



विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर मोहोपाडा तलाव परिसरात रसायनी पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना केल्या. विसर्जन सोहळा शांततेत पार पडला असून कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.गणेशोत्सवाच्या पहिल्या टप्प्यातील दीड दिवसांच्या गणरायाला भक्तांनी भावपूर्ण निरोप देत पुढील वर्षी पुन्हा लवकर येण्याचे आवाहन केले. यावेळी संपूर्ण मोहोपाडा परिसर 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

# लोधीवलीतील रिलायन्स टाऊनशिपमध्ये घरफोडी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

**९८ हजारांचे दागिने लंपास**

वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद विभागातील लोधीवली येथील रिलायन्स टाऊनशिपमध्ये अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सुमारे ९८ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व मौल्यवान साहित्य लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १३ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजल्यापासून दि. १४ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली. लोधीवली येथील रिलायन्स टाऊनशिपमधील घर क्रमांक बी-३३ येथे फिर्यादी यांच्या राहत्या घराच्या मुख्य दरवाजाचे लॅच तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. चोरट्याने बेडरूममधील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व अन्य साहित्य असा एकूण ९८,००० रुपयांचा ऐवज चोरून नेला.या प्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात` गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाशीमध्ये इमारतीचा सज्जा कोसळला



**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी-कोपरखैरणे मार्गावरील सेक्टर १५ मधील बी-टाइप अपार्टमेंट परिसरात, अरुण रेस्टॉरंटजवळील जी+३ मजली इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील खिडकीच्या वरील सज्जा अचानक खाली कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. रविवारी दुपारी तीन ते साडेतीनच्या दरम्यान ही घटना घडली

## जीवितहानी टळली

सदर इमारत सिडकोमार्फत बांधण्यात आलेली असून ती सुमारे ४० वर्षे जुनी आहे. या इमारतीमध्ये एकूण १६ कुटुंबे वास्तव्यास आहेत. सज्जा कोसळल्यानंतर इमारतीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने रहिवाशांनी खबरदारीचा उपाय म्हणून हळूहळू इमारत खाली करण्यास सुरुवात केली आहे. इमारतीतील कुटुंबे स्वतःच्या सोयीनुसार सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होत आहेत. घटनेची माहिती मिळताच रेस्क्यू सर्विसच्या पथकाने घटनास्थळी पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. सुदैवाने सज्जा कोसळण्याच्या वेळी कोणतीही व्यक्ती त्याखाली नसल्याने मोठी दुर्घटना टळली.

नवी मुंबईत सिडकोच्या जुन्या झालेल्या इमारती आणि त्यातील बांधकामाच्या स्थितीमुळे रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित यंत्रणांनी इमारतीची तातडीने पाहणी करून आवश्यक सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे.

# राहुल फार्मसी महाविद्यायात ॲनेमिया अवेअरनेस प्रोग्रॅम; ३४ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयात समर्पण रक्त केंद्र घाटकोपर व मेडिकल टेक्नॉलॉजिसट असोसिएशन ऑफ रायगड यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत - खालापुर तालुक्यात आयोजित केलेले ५४६ वे रक्तदान शिबीर होते. याप्रसंगी ॲनेमिया अवेअरनेस प्रोग्रॅम सुद्धा करण्यात आला.

ॲनेमिया अवेअरनेस प्रोग्रॅमचा शुभारंभ मेडिकल टेक्नॉलॉजिसट असोसिएशन ऑफ रायगडचे अध्यक्ष अबीद खान यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. याप्रसंगी सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, संस्थेचे खजिनदार झुलकरनैन डाभिया, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, उपाध्यक्ष किरण ज्योती, सदस्य कल्पेश पटेल, अभिलाषा पटेल, सुमित जाधव, डॉ. अतुल त्रिपाठी, डॉ. निलोफर खान आदी उपस्थित होते.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. अनिकेत इंदुलकर आणि संजय चौधरी यांनी सर्वप्रथम रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. रक्त संकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तकेंद्राचे डॉ. रमेश सिंग, आरोग्य सेविका शिला वाघमारे, दिपेश सरदार, श्रीराम नाईक, प्रदीप नितोरे, सुनिल निले आदींनी केले. सूत्रसंचालन प्रिया खापे यांनी केले.

याप्रसंगी डॉ. रुपाली येवले, प्रा. श्वेता दांगट, प्रा. मुक्ता गोचडे, तुषार घारे, सानिका जाधव, आदित्य अलिकडे, रूद्र जाधव, प्रणव जाधव, हेमंत जाधव, आदी उपस्थित होते.

# सुधागड पालीत दीड दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप

**पाली : प्रतिनिधी**

"गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या..." या जयघोषाने पाली शहर आणि सुधागड तालुका मंगळवारी दुमदुमून गेला. पारंपरिक ढोल-ताशांचा गजर, फुलांनी सजविलेल्या गणरायाच्या मूर्ती, भक्तिमय वातावरण आणि जड अंतःकरणाने भाविकांनी दीड दिवसांच्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये दीड दिवस भक्तिभावाने पूजा-अर्चा, आरती आणि विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यानंतर मंगळवारी गणरायाच्या विसर्जनाला सुरुवात झाली.

पाली शहरासह सुधागड तालुक्यातील विविध गावांमध्ये गणेशभक्तांनी उत्साहात मिरवणुका काढत गणरायाला निरोप दिला. बाप्पाच्या आगमनाने निर्माण झालेला उत्साह विसर्जनाच्या वेळीही कायम होता; मात्र लाडक्या बाप्पाला निरोप देताना अनेक भाविकांच्या डोळ्यांत भावुकता दिसून आली.



पाली शहरातील अंबा नदी घाटावर दीड दिवसांच्या गणरायाच्या विसर्जनासाठी शेकडो भाविकांनी गर्दी केली होती. ढोल-ताशांचा गजर आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणरायाच्या मूर्ती विसर्जनासाठी घाटावर आणण्यात आल्या. कुटुंबीयांसह आलेल्या भाविकांनी बाप्पाची अंतिम आरती करून भक्तिभावाने गणरायाला निरोप दिला.विसर्जनाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच भाविकांना सुरक्षितपणे विसर्जन करता यावे, यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती.

विसर्जन मिरवणुका आणि घाट परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पाली पोलीस ठाण्याच्या वतीने चोख सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. पोलीस निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली शहरातील प्रमुख चौक, मिरवणुकीचे मार्ग, अंबा नदी घाट तसेच संवेदनशील ठिकाणी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक नियंत्रणावर विशेष लक्ष देण्यात आले. महिला पोलीस कर्मचारी, वाहतूक शाखेचे कर्मचारी आणि स्थानिक स्वयंसेवकांनीही पोलिसांना सहकार्य केले. त्यामुळे विसर्जन मिरवणुका शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्या.

श्री बल्लाळेश्वर देवस्थान आणि पाली नगरपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने विसर्जन घाटावर विशेष व्यवस्था करण्यात आली होती. नदीचे प्रदूषण टाळण्यासाठी निर्माल्य नदीत विसर्जित न करता स्वतंत्रपणे संकलित करण्यासाठी घाटावर विशेष कलश ठेवण्यात आले होते.

# लिटिल एंजेल फाउंडेशनचा वर्धापन दिन साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी तळागाळातील मुला-मुलींना शिक्षित करून चांगले आयुष्य घडविण्यासाठी विना मोबदला मागील ९ वर्ष ऐरोलीतील लिटिल एंजेल फोउंडेशन ही सामाजिक संस्था अविरतपणे ज्ञानार्जन करीत असून इथ शिक्षण घेत असलेल्या आजी -माजी विद्यार्थ्यांनी आपला वर्धापनदिन मोठ्या उत्साहात ऐरोली सेक्टर १० येथील सेंट जोसेफ चर्च सभागृहात रविवारी साजरा केला.

ऐरोलीतील लिटिल एंजेल फोउंडेशन ही सामाजिक संस्था गेली ९ वर्षे अविरतपणे नवी मुंबई परिसरातील झोपडपट्टी, चाळ वस्त्यांमधील आर्थिक दुर्बल घटकांसाठी परीश्रम घेत आहे.यावेळी संगीत, नृत्याविष्कार,लघुनाटिका, जनजागृती, वक्तृत्व, स्किट आदी कार्यक्रमांची अनुभूती ह्याची देही ह्याची डोळा उपस्थितांनी अनुभवली.सहभागी सर्वांचा उत्साह ओसंडून वाहत होता.



फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रियंका बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम मागील ९ वर्षांपासून ऐरोली से. १० येथील सेंटरमध्ये सुरू आहे.

तसेच फउंडेशनची नोसील नाका, पटणी येथील सेंटर्स देखील सुरू आहेत.शाळेनंतर विद्यार्थ्यांना गृहपाठ, इतर शैक्षणिक मार्गदर्शन, शैक्षणिक, सामाजिक जागृती अश्या विषयांचे मार्गदर्शन, समुपदेशन शिक्षक मोफत देत आहेत. आपल्या रोजच्या कर्तव्यातून काही वेळ काढून हे ज्ञानसेवक भविष्य घडविण्यासाठी हातभार लावत आहेत.तारेवरची आर्थिक कसरत करून मानसिक व शारीरिक वेदना दुर्लक्षित करून प्रियंका बोबडे या क्रांतिज्योती सावित्रीबाईंचा शैक्षणिक वसा पुढे नेत आहेत . यावेळी डॉ. राकेश अग्रवाल, पंक्ती अग्रवाल, समाजसेविका कल्पना गोसावी, सुनीता नानोटे,ममता भोसले, कैलास चंद, प्रदीप मत्सुद,अकबर शेख, जॉनसर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जया बिष्ट, सारिका गद्रे , दत्ता मेघे कॉलेज, ,राधा यादव, अंबे यादव, रितेश यादव आदीनी मेहनत घेतली.

# विद्याभवनमध्ये मर्चंट नेव्हीचे करिअर मार्गदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शैक्षणिक संकुलात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'मर्चंट नेव्ही करिअर मार्गदर्शन' या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात मर्चेंट नेव्हीतील अनुभवी कॅप्टन मकरंद सरदेसाई, प्रोफेसर शशांक फोंडे आणि कॅडेट चंदरा ( डिप्लोमा इन नॉटिकल सायन्स विद्यार्थी) यांनी मार्गदर्शन केले.

यात मर्चेंट नेव्हीतील संधी आणि परीक्षांची माहिती तसेच जागतिक व्यापारातील महत्त्व आणि शिस्तबद्ध जीवनशैली यावर आपल्या मुख्य व्याख्यानात कॅप्टन मकरंद सरदेसाई यांनी प्रकाश टाकला.



प्रोफेसर शशांक फोंडे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रता प्रवेश परीक्षा, आणि कॉलेज स्पॉन्सरशिप प्रक्रियेबद्दल तांत्रिक व सविस्तर माहिती दिली, तसेच कॅडेट चंदराने आपला अनुभव विद्यार्थ्यांना सांगितला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना कॅप्टन सरदेसाई, प्रा. फोंडे आणि कॅडेट चंद्रा यांनी उत्तरे देऊन त्यांच्या मनातील भीती दूर केली.

या कार्यक्रमासाठी माध्यमिक मराठी व ज्यू. कॉलेजचे मुख्याध्यापक . गोरख कदम, माध्यमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीजा नायर, समन्वयक . पांडुरंग मुळीक तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. प्रीती वाघ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# वडाळे तलाव होणार जलपर्णीमुक्त

## जैविक नियंत्रणासाठी ५० हजार कीटकांचा दुसरा टप्पा





**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील ऐतिहासिक वडाळे तलावातील 'सॅल्विनिया मोलेस्टा' या जलपर्णीच्या समस्येवर कायमस्वरूपी, शास्त्रीय आणि पर्यावरणपूरक उपाय शोधण्यासाठी पनवेल महानगरपालिका आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या खरपतवार संशोधन संचालनालय, जबलपूर यांच्या संयुक्त पुढाकारातून जैविक नियंत्रणाची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा दुसरा टप्पा नुकताच सुरू करण्यात आला असून, त्याअंतर्गत तलावात ५० हजार 'सायटोंबॅगस साल्विनी' या जैविक कीटकांना सोडण्यात आले आहे.

वडाळे तलावातील जलपर्णी नष्ट करण्यासाठी मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात यापूर्वी २० हजार सायटोंबॅगस साल्विनी कीटक सोडण्यात आले होते. तलावातील अनुकूल वातावरणामुळे या कीटकांची नैसर्गिक वाढ मोठ्या प्रमाणात झाली असून, त्यांची संख्या आता लाखोंच्या घरात पोहोचल्याची माहिती देण्यात आली.

हे कीटक केवळ 'सॅल्विनिया मोलेस्टा' या जलपर्णीवरच उपजीविका करतात. त्यामुळे तलावातील इतर वनस्पती तसेच जलचरांना त्यांच्यामुळे कोणताही धोका निर्माण होत नाही. दुसऱ्या टप्प्यात आणखी ५० हजार कीटक सोडण्यात आल्याने जलपर्णी नष्ट होण्याच्या प्रक्रियेला अधिक वेग मिळण्याची अपेक्षा आहे.

वडाळे तलावाची जैवविविधता, जलपरिसंस्था आणि नैसर्गिक पर्यावरणीय संतुलन जपण्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. जलपर्णीच्या समस्येवर रासायनिक उपायांऐवजी जैविक पद्धतीचा अवलंब करण्यात येत असल्याने तलावाचे नैसर्गिक पर्यावरण सुरक्षित ठेवण्यास मदत होणार आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षकांचा विविध पुरस्कारांनी सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या अश्विनी पराग कासरेकर, प्रवीण पाटील, नमिता आखुरे-सिन्हा या शिक्षकांचा दिनांक ३० ऑगस्ट २०२६ या दिवशी पुण्यातील MIT येथे 'शिक्षक गौरव पुरस्कार' ने गौरव करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्टतेची प्रेरणा निर्माण करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या NCEAS - राष्ट्रीय शिक्षण, कला आणि क्रीडा परिषद शुभारंभ आणि शिक्षक गौरव कार्यक्रम मध्ये शिक्षक गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ENARK Education यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमाचे आयोजन वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे (MIT-WPU) येथे करण्यात आले होते. शिक्षण, कला आणि क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रेरणादायी कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाची दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच शिक्षिका राणी राहुल कडुसकर यांना दिनांक ६ सप्टेंबर २०२६ या दिवशी "सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार"याने गौरविण्यात आले. In Major City यांच्या वतीने राष्ट्रीय शिक्षक दिनानिमित "विद्यैव सर्वधनम् २०२६" या शैक्षणिक सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विद्यैव सर्वधनम् हा शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करणारा शैक्षणिक पुरस्कार व सन्मान सोहळा आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणाऱ्या, शिक्षणासाठी समर्पित असलेल्या शिक्षकांचा सन्मान केला जातो. शिक्षकांच्या समर्पणाची आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यातील त्यांच्या योगदानाची दखल घेणे, शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टता आणि नाविन्यपूर्ण कार्याला प्रोत्साहन देणे, शिक्षकांना त्यांच्या कार्यासाठी प्रेरणा आणि सार्वजनिक सन्मान देणे हा मुख्य उद्देश पुरस्कार प्रदान करण्यामागे आहे. शिक्षकांच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर ,व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख,सेक्रेटरी डॉ.गडदे ,प्राचार्या डॉ. निशा नायर मॅडम आदींनी शुभेच्छा दिल्या.

## किराणा दुकानामध्ये मद्यविक्री; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** किराणा दुकानांमध्ये मद्य विक्री केल्याप्रकरणी प्रकाश बुधाजी पाटील चिंद्रणगाव यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ११ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.११ सप्टेंबर रोजी चिन्द्रण गाव येथील अष्टविनायक किराणा स्टोअर्स मध्ये ४ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल विक्री करण्याच्या उद्देशाने पनवेल तालुका पोलिसांना सापडून आला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# राष्ट्रीय लोक अदालतीत पनवेल तालुक्यात सहा हजार प्रकरणे सामंजस्याने निकाली

## ४४ कोटी ६४ लाख ५७ हजार रुपयांहून अधिक रकमेची तडजोड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल न्यायालयात प्रलंबित तसेच दाखलपूर्व वादांचा जलद, सुलभ आणि सामंजस्यपूर्ण निपटारा व्हावा, पक्षकारांचा वेळ व खर्च वाचावा आणि परस्पर संवादातून वादांना कायमस्वरूपी पूर्णविराम मिळावा, या उद्देशाने पनवेल येथील जिल्हा व सत्र न्यायालयात आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या राष्ट्रीय लोक अदालतीत दाखलपूर्व व न्यायालयीन प्रलंबित अशी एकूण ६ हजार २७ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमध्ये तब्बल ४४ कोटी ६४ लाख ५७ हजार ६३२ रुपयांची तडजोड करण्यात आली.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा रायगड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये, न्यायमूर्ती तथा रायगड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अद्वैत सेठना तसेच रायगड-अलिबागचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. बी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली या राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांच्या शुभहस्ते दृकश्राव्य माध्यमातून झाले. यावेळी पनवेल न्यायालयातील न्यायिक अधिकारी, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष



विमलनाथ तिवारी, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. रत्नदीप पाटील तसेच कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील न्यायिक अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी, वकील संघटनांचे पदाधिकारी आणि अधिवक्तेही दृकश्राव्य माध्यमातून सहभागी झाले.

राष्ट्रीय लोक अदालतीसाठी पनवेल न्यायालयात एकूण सात लोक अदालत कक्ष स्थापन करण्यात आले होते. या कक्षांमध्ये एस. आर. चव्हाण, डी. एम. डोंगरे, आर. एन. चव्हाण, ए. एस. वाडकर, आर. वाय. खंडारे, पी. के. राठोड आणि एस. यू. जागुष्टे या न्यायिक अधिकाऱ्यांनी कामकाज पाहिले.

तसेच ॲड. इंद्रजित भोसले, ॲड. भूषण म्हात्रे, ॲड. शशिकांत म्हात्रे, ॲड. प्रज्ञा भगत, ॲड. अदील चौधरी, ॲड. सुयश कामेरकर आणि ॲड. सुनील तोटावाड यांनी पंच म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.राष्ट्रीय लोक अदालतीसमोर ७ हजार ७१८ दाखलपूर्व आणि ७ हजार ५१७ न्यायालयीन प्रलंबित, अशी एकूण १५ हजार २३५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १ हजार ९४९ दाखलपूर्व आणि ४ हजार ७८ प्रलंबित, अशी एकूण ६ हजार २७ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली.

दाखलपूर्व प्रकरणांमध्ये ३८ लाख ७० हजार २५८ रुपये, तर प्रलंबित प्रकरणांमध्ये ४४ कोटी २५ लाख ८७ हजार ३७४ रुपये इतक्या रकमेची तडजोड झाली. अशा प्रकारे एकूण ४४ कोटी ६४ लाख ५७ हजार ६३२ रुपयांची तडजोड करण्यात आली.

आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत आवश्यक त्या प्रकरणांमध्ये पक्षकारांना प्रत्यक्ष न्यायालयात उपस्थित राहण्याची सक्ती न करता व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून संवाद आणि आवश्यक पडताळणी करण्यात आली. त्यामुळे दूरवर असलेल्या किंवा अपरिहार्य कारणांमुळे प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकणाऱ्या पक्षकारांनाही लोक अदालतीच्या माध्यमातून वाद सामंजस्याने मिटविण्याची संधी मिळाली.

पनवेल वकील संघटनेने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पक्षकारांमध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.राष्ट्रीय लोक अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी अधीक्षक नाचण, वरिष्ठ लिपिक हेमंत अंबेतकर, कनिष्ठ लिपिक राहुल चव्हाण, विधी स्वयंसेवक शैलेश कोंडसकर, अधिवक्ते, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी तसेच पक्षकारांनी मोलाचे सहकार्य केले.

# कळंबोलीत रहिवासी संकुलात नऊ लाखांचा गुटखा जप्त

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहतीतील रहिवासी परिसरातच मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सेक्टर-२ येथील एलआयजी-२, श्री अपार्टमेंट परिसरातील एका बंद खोलीत आढळलेल्या या साठ्यावर कारवाई करण्यात आली असून, सुमारे ९ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक रामदास शेवाळे यांनी सांगितले.

कळंबोली परिसरातील विविध भागांत गुटखा आणि अमली पदार्थांची विक्री होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत होत्या. या तक्रारींची दखल घेत रामदास शेवाळे यांनी प्रभाग क्रमांक आठमध्ये पाहणी केली. यावेळी परिसरातील उद्याने तसेच नागरिकांकडून तक्रारी येत असलेल्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली.



एमजीएम रुग्णालयालगतच्या छोट्या उद्यानात गुटखा आणि अमली पदार्थांचे सेवन होत असल्याच्या तक्रारीही नागरिकांनी केल्या होत्या. पाहणीदरम्यान सेक्टर-२ मधील श्री अपार्टमेंट परिसरातील एका बंद खोलीबाबत संशय निर्माण झाला. संबंधित घराला कुलूप असल्याने खिडकीची काच सरकवून पाहणी केली असता आतमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा असल्याचे दिसून आले.

यानंतर ही बाब पोलिसांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. संबंधित ठिकाणी कारवाई करण्यात आली असून, जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत ९ लाख २१ हजार रुपये असल्याचे शेवाळे यांनी सांगितले.

या ठिकाणी गेल्या काही वर्षांपासून गुटख्याचा साठा केला जात असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. याच ठिकाणाहून कळंबोलीसह परिसरात गुटख्याचा पुरवठा केला जात असल्याचेही सांगण्यात आले. त्यामुळे रहिवासी संकुलातील बंद खोलीत एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित पदार्थांचा साठा कसा झाला, याचा सखोल तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या घटनेनंतर शिवसेनेच्या वतीने कळंबोलीपासून गुटखा आणि अमली पदार्थविरोधी व्यापक अभियान सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'गुटखा आणि अमली पदार्थमुक्त पनवेल' हा संदेश देत जनजागृती करण्यात येणार आहे.

याअंतर्गत दोन हजार विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली, नशामुक्तीची प्रतिज्ञा, पथनाट्ये, गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून प्रबोधन, 'नशामुक्ती आरती संग्रह' आणि 'भगवे भरारी पथक' अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे शेवाळे यांनी सांगितले.

"रहिवासी भागात गुटख्याचा साठा करून त्याची विक्री केली जात असेल, तर हा प्रकार यापुढे खपवून घेतला जाणार नाही. तरुणाईला नशेपासून वाचविण्यासाठी शिवसेना रस्त्यावर उतरून लढा देईल," असा इशाराही रामदास शेवाळे यांनी दिला.

# गणेश विसर्जनासाठी खांदेश्वर व आदई तलाव परिसरातील वाहतुकीत बदल

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खांदेश्वर मंदिर तलाव आणि आदई तलाव येथे मोठ्या प्रमाणात गणेशमूर्तींचे विसर्जन होणार आहे. गौरी-गणपती विसर्जन तसेच अनंत चतुर्दशीच्या दिवशी विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी पोलिसांकडून वाहतुकीच्या मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

गौरी-गणपती विसर्जनासाठी १९ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजल्यापासून २० सप्टेंबर रोजी पहाटे ३ वाजेपर्यंत, तर अनंत चतुर्दशीच्या विसर्जनासाठी २५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजल्यापासून २६ सप्टेंबर रोजी पहाटे ५ वाजेपर्यंत हे वाहतूक बदल लागू राहणार आहेत.

### खांदा कॉलनीतील खांदेश्वर तलावासाठी विसर्जन मार्ग

छत्रपती शिवाजी महाराज चौक, सेक्टर १० भारतीय स्विट ॲक्सिस बँक उजवीकडे वळून सुयोग अपार्टमेंट, पी.एल. ५/बी, सेक्टर १ महात्मा स्कूल श्री शनैश्वर व हनुमान मंदिर अष्टविनायक हॉस्पिटल खांदेश्वर तलाव, असा विसर्जन मार्ग निश्चित करण्यात आला आहे.

प्रवेशबंदी-१. त्रिमूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था, सेक्टर ८, खांदा कॉलनी येथून महात्मा स्कूलकडे जाणाऱ्या गणपती वाहनांना व ट्रॉलींना प्रवेश बंद राहील.

२. श्री कृपा बँक्वेट हॉल, प्लॉट क्रमांक १, सेक्टर ६, खांदा कॉलनी येथून तलावाकडे जाणाऱ्या गणपती वाहनांना व ट्रॉलींना प्रवेश बंद राहील.अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या प्रवेशबंदीतून वगळण्यात आले आहे.

पर्यायी मार्ग-ॲक्सिस बँकेकडून खांदेश्वर तलावाकडे जाणारी वाहने ॲक्सिस बँकेपासून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे डावीकडे वळून इच्छित स्थळी जातील.

ॲक्सिस बँकेकडून नेत्रज्योत धर्मादाय नेत्र रुग्णालय आणि तुलसी प्रेरणा परिसराकडे जाणारी वाहने खांदेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था, पी.एल. ५/बी, सेक्टर १, खांदा कॉलनीमार्गे जातील.

आसूडगावकडून ॲक्सिस बँकेकडे येणारी वाहने आगरी शिक्षण संस्था शाळा, सेक्टर ६, खांदा कॉलनी येथील नाल्याच्या बाजूने इच्छित स्थळी जातील.

### आदई तलावासाठी विसर्जन मार्ग

आदई सर्कल झुडिओ (प्रजापती ओपल सोसायटी), सेक्टर १०, नवीन पनवेल आदई तलाव, हा एक विसर्जन मार्ग निश्चित करण्यात आला आहे.

दुसऱ्या मार्गात भावना मेडिकल, सेक्टर ३, नवीन पनवेल डायमंड पार्क सहकारी सोसायटी, प्लॉट क्रमांक २१०/२११, सेक्टर ४ गोकुळ डेअरी, प्लॉट क्रमांक २२, सेक्टर ५ तुलसी हाइट्स डावीकडे वळून आई स्नॅक्स कॉर्नर, सेक्टर ५ कजरी स्वीट्स अँड ड्रायफ्रूट्स, सेक्टर ५-अ गुरुद्वारा सेक्टर ७ रिक्षा स्टँड हॉटेल फिनिक्स चौक उजवीकडे वळून आदई तलाव, असा मार्ग राहणार आहे.

प्रवेशबंदी-तुलसी हाइट्स (सिरवी बंधू मिठाईवाला), प्लॉट क्रमांक १, सेक्टर ५ येथून भावना मेडिकलकडे जाणाऱ्या गणपती वाहनांना व ट्रॉलींना प्रवेश बंद राहील. अत्यावश्यक सेवेतील वाहनांना यातून वगळण्यात आले आहे.

पर्यायी मार्ग-नवीन पनवेल सेक्टर ५, ६ आणि ७ येथील नागरिकांनी आदई सर्कलकडे जाण्यासाठी नॅशनल कॉम्प्लेक्स नोंदणी कार्यालय डी-मार्ट एचडीएफसी चौक मार्गे आदई सर्कलकडे जावे.

खांदा कॉलनीकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपुलावरून आदई सर्कलकडे जाणाऱ्या वाहनांनी उड्डाणपुलावरून उतरल्यानंतर पोलीस प्लॉट, सेक्टर ५-अ, सेक्टर १ येथून डावीकडे वळावे. त्यानंतर सेंट जोसेफ स्कूल मारुती रचना सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट क्रमांक सी-७, सेक्टर ७ डावीकडे वळून सांडपाणी पंपगृह, सेक्टर ५-अ डावीकडे वळून नोंदणी व मुद्रांक कार्यालय डी-मार्ट एचडीएफसी चौक मार्गे इच्छित स्थळी जाता येईल.

गणेशोत्सव काळात विसर्जन मिरवणुका आणि नागरिकांची मोठी गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी हे बदल करण्यात आले आहेत. नागरिकांनी तसेच गणेश मंडळांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करून निर्धारित मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडक

### ७४ हजारांच्या ऐवजाची चोरी

**नवीन पनवेल :** ७४ हजार रुपयांच्या ऐवजांची चोरी केल्याप्रकरणी १० सप्टेंबर रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात चोरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. युनिक आर के सी प्रोजेक्ट एलएलपी कंपनीच्या रूट्स फार्म हाऊसच्या पाठीमागे आंबे शिरवली वडोदरा मुंबई हायवेचे काम चालू असलेल्या ठिकाणी पी क्यू सी पेवर मशीन त्यावरील ऑपरेटरने पार्क केलेली असता त्यातील एक्साइड कंपनीच्या दोन बॅटऱ्या, मशीनच्या वापरण्यात येणाऱ्या स्टेरिंग सिलेंडर बकेट असा एकूण ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरांनी चोरून नेला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### चाकू व रॉडने धमकावत डिझेलची चोरी

**नवीन पनवेल :** चौघा जणांनी चाकू आणि लोखंडी रॉडने धमकावून डंपरमधील ३१० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी चौघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ी गुन्हा दाखल करण्यात आला.नबीर सूल पळस्पे ते जेएनपीटी हायवेवर नांदगाव येथे लघुशंका करण्यासाठी त्याने डंपर रस्त्याच्या कडेला पार्क केला असता चाकू आणि लोखंडी रॉडने धमकावले आणि डंपर मधील ३१० लिटर डिझेलची चोरी केली.

# कामोठे येथील बिकानेरमध्ये बुरशी लागलेली रसमलाई

## नागरिकांची विक्रेत्यावर कडक कारवाईची मागणी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर-२५ येथील दुकानात ग्राहकाला खराब आणि बुरशी लागलेली रसमलाई विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महत्वाचं म्हणजे उपस्थित असलेल्या नागरिकांनी देखील हे खाद्यपदार्थ खाल्ल्यानंतर संताप व्यक्त केला.

अक्षय देवकर यांनी दुकानातून रसमलाई खरेदी केली. मात्र घरी आणल्यानंतर रसमलाई खराब झाल्याचे आणि त्यावर बुरशी लागल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या प्रकाराची माहिती दुकान मालकाला



दिल्यानंतर संबंधित मालकाने रसमलाई खराब असल्याचे मान्य करत माफी मागितली.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या काळात नागरिक मोठ्या प्रमाणात मिठाई आणि खाद्यपदार्थांची खरेदी करत असताना अशा प्रकारे खराब खाद्यपदार्थांची विक्री होणे हा नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रकार असल्याने घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी संताप व्यक्त केला.

या प्रकरणाची अन्नसुरक्षा विभागाने तातडीने दखल घेऊन संबंधित दुकानाची तपासणी करावी, खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेची पाहणी करावी आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास अन्न सुरक्षा विभागा तर्फे कठोर कारवाई करावी, तसेच पनवेल परिसरात दुकानांची तपासणी करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## संपादकीय

# शुल्कावरून गदारोळ

सरकारने युपीआयवर सरसकट शुल्क लागू केलेले नाही. यासंदर्भातील अधिसूचनेने आताच दोन हजार रुपयांपेक्षा मोठ्या युपीआय व्यवहारांवर शुल्क लावलेले नाही. अधिसूचनेतून सूचित होणारा बदल करण्याची गरज सरकारला का वाटली असावी हे लक्षात घेतले पाहिजे.

**डिजिटल भारतात युपीआयद्वारे व्यवहार करणे एव्हाना अगदी सर्वसामान्यांच्याही जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. या युपीआय व्यवहारांसंदर्भात केंद्र सरकारने १४ सप्टेंबरला एक राजपत्र अधिसूचना जारी केली आहे. संबंधित अधिसूचना जारी होताच 'युपीआयवर शुल्क लादण्याचा मार्ग मोकळा केल्याचा' आरोप विरोधकांनी सरकारवर केला. विरोधी पक्षांच्या या आरोपांमुळे यासंदर्भात राजकीय वाद रंगला आहे. मात्र अधिसूचनेत प्रत्यक्षात नेमके काय म्हटले आहे याचा शांतपणे विचार केला असता चित्र बरेच वेगळे असल्याचे दिसते. सर्वसामान्यांसाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की सरकारने युपीआयवर सरसकट शुल्क लागू केलेले नाही. अधिसूचनेनुसार दोन हजार रुपयांपर्यंतच्या युपीआय व्यवहारांवर बँक किंवा पेमेंट सिस्टम पुरवठादार थेट किंवा अप्रत्यक्ष कोणतेही शुल्क आकारू शकणार नाहीत. रुपे डेबिट कार्डच्या व्यवहारांनाही ही संरक्षणाची तरतूद लागू आहे. म्हणजे किराणा दुकानात, भाजीवाल्याकडे, चहाच्या टपरीवर किंवा रोजच्या छोट्या खरेदीसाठी सर्वसामान्य करत असलेले दोन हजार रूपयांपर्यंतचे व्यवहार पूर्वीप्रमाणेच शुल्कमुक्त राहणार आहेत. अधिसूचनेमुळे जी चर्चा सुरू झाली आहे ती दोन हजार रुपयांच्या पुढच्या व्यवहारांविषयी आहे. अधिसूचनेने आताच दोन हजार रुपयांपेक्षा मोठ्या व्यवहारांवर शुल्क लावलेले नाही. मात्र अशा काही व्यापारी व्यवहारांवर भविष्यात मर्चंट डिस्काऊंट रेट अर्थात एमडीआर लागू करण्यासाठी कायदेशीर चौकट या अधिसूचनेमुळे तयार झाली आहे. त्याचा अंतिम दर, व्याप्ती आणि अंमलबजावणी याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. विशेष म्हणजे व्यक्ती–ते–व्यक्ती व्यवहार शुल्कमुक्त ठेवण्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. हा बदल करण्याची गरज सरकारला का वाटली हे लक्षात घेतले पाहिजे. देशात युपीआयचा विस्तार अभूतपूर्व वेगाने झाला आहे. एवढ्या प्रचंड डिजिटल पायाभूत व्यवस्थेसाठी सायबर सुरक्षा, फसवणूक प्रतिबंध, तांत्रिक सुधारणा आणि पायाभूत सुविधांवर सातत्याने मोठी गुंतवणूक आवश्यक आहे. युपीआय दीर्घकाळ टिकाऊ, सुरक्षित आणि अधिक व्यापक करण्यासाठी केवळ सरकारी मदतीवर अवलंबून राहण्याऐवजी मर्यादित व्यापारी व्यवहारांमधून उत्पन्नाचे शाश्वत मॉडेल तयार करणे आवश्यक आहे. मात्र विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी सरकारवर अमेरिकन कंपन्यांच्या दबावाला झुकल्याचा आरोप केला आहे. दोन हजार रुपयांपेक्षा मोठ्या व्यापारी युपीआय व्यवहारांवर शुल्क लागू झाल्यास त्याचा अंतिम भार ग्राहकांवर टाकला जाऊ शकतो असा विरोधकांचा युक्तिवाद आहे. परंतु सामान्य ग्राहकाकडून युपीआय वापरण्याचे शुल्क घेण्याचा निर्णय झालेला नाही हे सरकारने स्पष्ट केले आहे. शुल्क लागू झाल्यास ते मर्यादित व्यापारी व्यवहारांपुरते आणि नाममात्र असेल हे सरकारने स्पष्ट केले आहे. बहुतांश व्यापारी व्यवहारही शुल्कमुक्त राहतील. विरोधकांची यासंदर्भातील ओरड ही वस्तुस्थिती लक्षात न घेता केलेली आहे. युपीआयची सुरक्षा शाश्वत राखताना सामान्य नागरिक आणि छोट्या व्यापाऱ्यांवर कोणताही अनावश्यक भार पडणार नाही याची काळजी घेताना सरकारची कसोटी लागणार आहे. युपीआय व्यवहार ही डिजिटल भारताची मोठी कामगिरी असून ती टिकवताना अफवांना बळी जाणे टाळायला हवे. तसेच सुधारणांमागील आर्थिक गरज समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.**

# कौशल्ये बजावतात महत्त्वाची भूमिका



आजच्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी केवळ पदवी पुरेशी नसते, तर त्यासोबत विविध कौशल्यांची जोड आवश्यक असते. कोणत्याही क्षेत्रात स्वतःचे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी कौशल्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. कौशल्ये म्हणजे अशी क्षमता, जी आपल्याला आपले काम सहज, योग्य आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यास सक्षम करते. प्रत्येक व्यक्तीकडे काही ना काही कौशल्ये असतात, ज्यामुळे त्याची स्वतःची ओळख निर्माण होते. परंतु, कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी काही विशिष्ट कौशल्ये अत्यंत आवश्यक ठरतात. या लेखात अशाच काही महत्त्वाच्या कौशल्यांचा सविस्तर आढावा मी घेतला आहे.

'संवाद कौशल्य' हे यशस्वी कामगिरीचा पाया आहे. प्रभावी संवादामुळे सहकारी, वरिष्ठ, ग्राहक किंवा मित्रमैत्रिणींशी सकारात्मक संबंध निर्माण होतात आणि कामातील अडचणी दूर होतात. चांगला संवाद साधण्यासाठी दुसऱ्याचे म्हणणे बारकाईने ऐकणे, आपले विचार स्पष्ट आणि संक्षिप्तपणे मांडणे, आत्मविश्वासाने बोलणे, सकारात्मक शब्दांचा वापर करणे आणि समोरच्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे. मित्र, कुटुंब आणि सहकाऱ्यांशी नियमित संभाषणाचा सराव केल्यास संवाद कौशल्य सुधारते, ज्याचा कामावर सकारात्मक परिणाम होतो.

'वेळेचे व्यवस्थापन' – कोणतेही काम, मग ते छोटे असो वा मोठे, वेळेचे योग्य नियोजन आणि पालन करणे आवश्यक आहे. वेळेची कदर करणारी व्यक्ती नेहमीच विश्वासार्ह ठरते. कामाचे प्राधान्य ठरवून नियोजन करणे, ठरलेल्या वेळेच्या किमान एक तास आधी तयारी करणे आणि अनावश्यक गोष्टींमुळे वेळ वाया घालवणे टाळणे या बाबी वेळेचे व्यवस्थापन सुधारण्यास मदत करतात. यामुळे कामाची कार्यक्षमता वाढते आणि विश्वासार्हता निर्माण होते.

'समस्या सोडवण्याची क्षमता' हे आणखी एक महत्त्वाचे कौशल्य आहे. कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी स्वतःहून सोडवण्याचा प्रयत्न करणे आणि नवीन उपाययोजना सुचवणे यामुळे आपली सर्जनशीलता आणि कार्यक्षमता दिसून येते. समस्येचे मूळ शोधून त्यावर उपाय शोधणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आणि सहकाऱ्यांशी चर्चा करून उपाय शोधणे या गोष्टी या कौशल्याचा भाग आहेत. यामुळे कामाच्या ठिकाणी आपले योगदान अधिक प्रभावी ठरते.

'तांत्रिक कौशल्ये' आजच्या डिजिटल युगात अनिवार्य ठरली आहेत. आपण ज्या क्षेत्रात काम करतो, त्या क्षेत्रातील मूलभूत तांत्रिक ज्ञान असणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, संगणकाचे मूलभूत ज्ञान, सॉफ्टवेअर हाताळणी, डेटा विश्लेषण आणि इंटरनेटचा वापर यांचा समावेश होतो. तसेच, क्षेत्र–विशिष्ट तंत्रज्ञान किंवा साधनांचे ज्ञान, जसे की प्रोग्रामिंग, डिझायनिंग किंवा डेटा मॅनेजमेंट, यामुळे आपण कामात प्रगती करू शकतो आणि नवीन संधी मिळवू शकतो.

'प्रभावी लेखन आणि वाचन' ही कौशल्ये कामाच्या ठिकाणी तितकीच महत्त्वाची आहेत. स्पष्ट आणि व्यावसायिक लेखनामुळे आपले विचार व्यवस्थित मांडता येतात, तर चांगले वाचन नवीन माहिती आत्मसात करण्यास मदत करते. अचूक आणि व्याकरणदृष्ट्या बरोबर लेखन करणे आणि कामाशी संबंधित दस्तऐवज किंवा माहिती नीट समजून घेणे यामुळे कामाची गुणवत्ता वाढते.

'संघकामगिरी (टीमवर्क)' हे यशस्वी कामगिरीचे महत्त्वाचे सूत्र आहे. समंजसपणे आणि सहकार्याच्या भावनेने काम केल्यास मोठी कामे सहज पूर्ण होतात. सहकाऱ्यांना मदत करणे, त्यांच्या मतांचा आदर करणे आणि संघाचे ध्येय साध्य करण्यासाठी योगदान देणे या बाबी संघकामगिरीला बळकटी देतात. यामुळे कामाचे वातावरण सकारात्मक राहते आणि उत्पादकता वाढते.

'नैतिक मूल्ये आणि प्रामाणिकपणा' राखणे कामाच्या ठिकाणी अत्यंत गरजेचे आहे. नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, जबाबदारी स्वीकारणे, चुका मान्य करणे आणि पारदर्शक व प्रामाणिक वर्तन ठेवणे यामुळे आपली विश्वासार्हता वाढते आणि दीर्घकालीन यश मिळते. प्रामाणिक व्यक्ती नेहमीच विश्वासार्ह ठरते आणि त्याला कामाच्या ठिकाणी आदर मिळतो.

'आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता' हे कौशल्य यशस्वी करिअरसाठी आवश्यक आहे. स्वतःवर विश्वास ठेवून निर्णय घेण्याची क्षमता असावी आणि चुका झाल्यास त्यातून शिकण्याची वृत्ती ठेवावी. आत्मविश्वासामुळे आव्हानांना सामोरे जाण्याची हिंमत मिळते, स्वतःच्या क्षमतांवर विश्वास वाढतो आणि स्वतंत्रपणे काम करण्याची क्षमता विकसित होते.

'सतत शिकण्याची वृत्ती' ही आजच्या बदलत्या काळात अत्यंत महत्त्वाची आहे. तंत्रज्ञान आणि कामाच्या पद्धती सतत बदलत असतात, त्यामुळे जिज्ञासू वृत्ती ठेवून नवीन गोष्टी शिकणे आवश्यक आहे. नवीन कौशल्ये शिकण्यासाठी प्रशिक्षण घेणे, उद्योगातील नवीन घडामोडींशी अद्ययावत राहणे आणि संशोधन वृत्ती ठेवून नवीन माहिती मिळवणे यामुळे कामात प्रगती होते.

'सृजनशीलता आणि अनुकूलता' ही कौशल्ये कामात नाविन्य आणण्यासाठी महत्त्वाची आहेत. नवीन आणि नाविन्यपूर्ण कल्पना मांडणे, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे आणि कामात सर्जनशीलता आणणे यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे ठरतो. सृजनशील व्यक्ती नेहमीच नवीन संधी निर्माण करू शकते.

'भावनिक बुद्धिमत्ता' म्हणजे स्वतःच्या आणि इतरांच्या भावना समजून घेण्याची आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता. यामुळे सहकाऱ्यांशी सकारात्मक संबंध निर्माण होतात, तणावपूर्ण परिस्थितीत शांत राहता येते आणि संघर्षांचे निराकरण प्रभावीपणे करता येते. भावनिक बुद्धिमत्ता कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण निर्माण करते.

'नेटवर्किंग कौशल्य' हे व्यावसायिक संबंध निर्माण करण्यासाठी आणि नवीन संधी मिळवण्यासाठी उपयुक्त ठरते. उद्योगातील लोकांशी संपर्क साधणे, व्यावसायिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे आणि सामाजिक व्यासपीठांचा योग्य वापर करणे यामुळे करिअरच्या नवीन संधी उपलब्ध होतात.

कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, तांत्रिक ज्ञान, संघकामगिरी, नैतिक मूल्ये, आत्मविश्वास, सृजनशीलता, भावनिक बुद्धिमत्ता, सतत शिकण्याची वृत्ती आणि नेटवर्किंग कौशल्ये अत्यंत आवश्यक आहेत. ही कौशल्ये आत्मसात केल्यास आपण आपल्या करिअरमध्ये यशस्वी होऊ शकतो आणि समाजात चांगले स्थान मिळवू शकतो. प्रत्येकाकडे काही ना काही कौशल्य असते, परंतु ते वेळीच ओळखून त्यावर मेहनत घेणे गरजेचे आहे. सध्याच्या बाजारपेठेत कौशल्य असलेल्या व्यक्तींना मोठ्या संधी उपलब्ध होतात. म्हणूनच या कौशल्यांचा विकास करून आपण आपल्या करिअरला नवी उंची देऊ शकतो.

**–समीक्षा चव्हाण**

मु.पो. तारळे, ता. पाटण, जि. सातारा



## बदलते तंत्रज्ञान

# प्रेशर कुकर वापरताना 'या' गोष्टींची घ्या काळजी

कुकर शिट्टी वाजवत नाही यामागे अनेक कारणे असू शकतात. एक सामान्य कारण म्हणजे प्रेशर रिलीज व्हॉल्व्ह किंवा कुकरवर शिट्टी लावणारा भाग ब्लॉक झालेला असतो. जेव्हा वाफेचा रस्ता ब्लॉक केला जातो, तेव्हा आतील दाब वाढत राहतो परंतु बाहेर पडू शकत नाही, ज्यामुळे कुकर फुटू शकतो. अशा परिस्थितीत, गॅस ताबडतोब बंद करणे आणि कुकर थंड होऊ देणे सर्वात महत्वाचे आहे. कुकर थंड करण्यासाठी, तो काढून बाजूला ठेवा आणि कोणत्याही परिस्थितीत जबरदस्तीने शिट्टी काढण्याचा प्रयत्न करू नका.



जर कुकरमध्ये जास्त पाणी किंवा अन्न भरले तर, दाब योग्यरित्या तयार न झाल्यामुळे शिट्टी वाजत नाही. म्हणून, कुकरची कमाल मर्यादा नेहमी लक्षात ठेवा आणि ती जास्त भरू नका. कुकरमध्ये योग्य प्रमाणात पाणी आणि पुरेशी जागा असावी जेणेकरून वाफ तयार होईल आणि ती शिट्टीद्वारे बाहेर पडेल.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे रबर गॅस्केट किंवा सील खराब होणे. जर ते सैल किंवा फाटलेले असेल तर कुकर व्यवस्थित बंद होत नाही आणि प्रेशर लीक होतो. यामुळे शिट्टी वाजत नाही आणि अन्न व्यवस्थित शिजत नाही. म्हणून, कुकरचे रबर सील, शिट्टी आणि सेफ्टी व्हॉल्व्ह वेळोवेळी तपासले पाहिजेत. वापरल्यानंतर, ते पूर्णपणे स्वच्छ करा आणि कोरडे ठेवा जेणेकरून घाण किंवा गंज टाळता येईल.

जर तुम्हाला वाटत असेल की कुकर खूप गरम झाला आहे पण शिट्टी अजूनही वाजत नाही, तर तो ताबडतोब गॅसवरून काढा. पण तो थंड करण्यासाठी पाण्याखाली ठेवण्याचा प्रयत्न करू नका. यामुळे कुकरमधील दाब अचानक कमी होऊ शकतो आणि झाकण फुटू शकते. योग्य मार्ग म्हणजे तो नैसर्गिकरित्या थंड होऊ देणे आणि नंतर झाकण उघडणे. लक्षात ठेवा, प्रेशर कुकर जितका उपयुक्त आहे तितकीच त्याची वापरताना काळजी न घेतल्यास तो धोकादायक देखील ठरू शकतो. म्हणून जर कुकरची शिट्टी वाजत नसेल, तर घाबरू नका पण निष्काळजीही राहू नका. योग्य पद्धत अवलंबा आणि वेळोवेळी ती तपासत राहा. यामुळे तुमचे कुटुंब आणि तुमचे किचन सुरक्षित राहण्यास मदत होईल.

# शास्त्रीय गायिका केसरबाई केरकर

## निमित्त



हिंदुस्थानी संगीतशैलीतील जयपूर–अत्रौली घराण्याच्या ख्यातनाम मान्यवर गायिका केसरबाई केरकर यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यांचा जन्म गोव्यातील केरी (तालुका फोंडा) या गावी गोमंतकातील संगीतपरंपरा असलेल्या कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव भीमाई होते. लहानपणी गावात होणाऱ्या गवळणकाला उत्सवात त्या श्रीकृष्णाची भूमिका करत. त्यांची भूमिका पाहण्यासाठी व गायन ऐकण्यासाठी परगावांहूनही लोक येत असत.

वयाच्या आठव्या वर्षी कोल्हापूर येथील वास्तव्यात त्यांनी किराणा घराण्याचे उ. अब्दुल करीमखाँ यांच्याकडे गायन शिकायला आरंभ केला. ही तालीम दहा महिने चालली. पुढे गोव्यातील लामगाव व बांदोडे येथे ग्वाल्हेर घराण्याचे पं. रामकृष्णबुवा वझे यांच्याकडे सुमारे तीन वर्षे त्रुटित स्वरूपाचे शिक्षण घेतले. १९०८ साली आई व मामाबरोबर त्या मुंबईस आल्या. तेथे प्रसिद्ध बीनकार व सतारीये उ. बरकतुल्लाखाँ यांच्याकडे १९१५ पर्यंत त्या गायन शिकल्या. १९१२ साली उ. अल्लादियाखाँ यांच्याकडूनही अल्पकाळ संगीतशिक्षण मिळाले. सुमारे चार महिने पं. भास्करबुवा बखले यांचीही तालीम त्यांना मिळाली. दरम्यान हिरालाल यांच्याकडून कथ्थक नृत्य व मँझलेखाँ यांच्याकडून अदाकारीच्या ठुमरीची तालीम त्यांनी घेतली. १९१७ पर्यंत वरील सर्व गुरूंकडून काहीशी खंडित स्वरूपाची तालीम त्यांना मिळाली. गायन शिकण्याची तीव्र इच्छा असूनही दीर्घकाळ कोणत्याच गुरूकडे सलग शिक्षण न झाल्याने त्या व्यथित होत्या.

१९१८ साली झालेल्या एका घटनेने केसरबाईंच्या संगीतशिक्षणाच्या इच्छेस जिद्दीचे स्वरूप आले. एका संगीत मैफलीतील अपमान जिव्हारी लागल्याने त्यांनी उत्तम तालीम प्राप्त करून गायनात प्रभुत्व मिळवण्याचा चंग बांधला. जयपूर–अत्रौली घराण्याच्या अल्लादियाखाँसाहेबांकडे तालीम घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. अखेरीस सेठ विठ्ठलदास द्वारकादास यांच्या मध्यस्थीने खाँसाहेबांनी काही अटी घालून शिकवायचे कबूल केले. १ जानेवारी १९२१ रोजी गंडाबंधन समारंभ होऊन केसरबाई खाँसाहेबांच्या रीतसर शागीर्द झाल्या. त्यांना खाँसाहेबांकडून अत्यंत सक्त व शिस्तशीर तालीम मिळाली. त्यांच्याकडून अनेक आम व खास राग तसेच बंदिशींची तालीम मिळाल्यावर केसरबाई मैफलींत प्रस्तुती करू लागल्या.

केसरबाई अत्यंत मानी होत्या. हा स्वभाव अनेकांना सकृद्दर्शनी आत्मप्रौढीचा वाटे. मात्र कोणत्याही बाबतीत सवंगपणा, हीणकसपणा त्यांना मान्य नव्हता. व्यावसायिक ध्वनिमुद्रणे, रेडिओवरून गायन त्यांना पसंत नव्हते. मात्र हिज मास्टर्स व्हॉइसचे ध्वनिमुद्रण अधिकारी, गायक जी. एन्. जोशी यांनी मोठ्या मिनतवारीने केसरबाईंना राजी केले आणि मग हिज मास्टर्स व्हॉइस आणि कोलंबिया या ध्वनिमुद्रणसंस्थांसाठी त्यांनी ध्वनिमुद्रणे केली. मुंबईतील शिवाजी पार्क येथील आपल्या दुमजली बंगल्यात त्यांचे वास्तव्य होते. उतारवयात त्यांनी धोंडूताई कुलकर्णी यांना तालीम दिली. धोंडूताई या केसरबाईंच्या एकमात्र शिष्या होत. मुंबई येथे केसरबाई यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## फिट राहायचेय तर 'या' पदार्थांचा करा वापर!

आजकाल बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांचे वजन वाढत आहे. त्यामुळे फिगर चांगली व्हावी म्हणून अनेकजण फिटनेस सेंटरमध्ये घाम गाळत आहेत, परंतु कार्यालयातील बैठे काम आणि फास्टफूडचा वापर यामुळे वजनवाढ आणि बेढब शरीर ही आजकाल सर्वसामान्य समस्या झाली आहे.



लठ्ठपणा ही जगभरातील समस्या बनली असून त्यामुळे अनेक आजार शरीरात घर करुन राहीले आहेत. काही वनस्पती देखील वजन कमी करण्यास मदत करीत असतात. त्या कोणत्या ते पाहूयात..

जगभरातील लठ्ठपणामुळे जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. अनेकांना बदलत्या जीवनशैलीमुळे व्यायामासाठी वेळ काढता येणे अशक्य झाले आहे. त्यांच्यासाठी या वनस्पती कामी येणाऱ्या आहेत.

**त्रिफळा** –त्रिफळा हे नावावरुनच तीन फळांचे मिश्रण असते. यात आमलकी, बिभीतकी आणि हरितकी या फळाचे मिश्रण असते. त्रिफळा आरोग्यासाठी खूपच गुणकारी आहे. याला पचन समस्येसाठी वापरले जाते. यामुळे पचनआणि एलिमिनेशन यात सुधारणा होऊन वजन घटविण्यास मदत मिळते.

**बडीशेप** –बडीशेप आपण जेवणानंतर माऊथफ्रेशनर म्हणून वापरत असतो. बडीशेफ ही वजन घटविण्यासाठी देखील फायदेशीर आहे. यात विरघळणारे फायबर आढळते. त्यामुळे आपल्याला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते. यामुळे भूक कमी होते. आणि पचन यंत्रणेत सुधारणार होते. त्यामुळे बडीशेफ खाण्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.

**दालचिनी** –दालचिनी ही मसाल्यात वापरली जाते. प्रत्येक भारतीय घरात दालचिनी असते. यात थर्मोजेनिक गुणधर्म असतात. जे मेटाबॉलीजम वाढवितात, तसेच चरबी जाळण्यास मदत करतात.

**हळद** –हळदीत अनेक औषधी गुणधर्म आहे. अनेक भारतीय पदार्थांत हळद वापरली जाते. यातील एक्टीव्ह करक्यूमिनमध्ये ॲण्टी इफ्लेमेटरी गुण आढळतात. जे चरबी जमा होण्यास रोखतात.

**मेथीदाणे** –मेथीदाणेदेखील वजन कमी करण्यासाठी वापरतात. यातदेखील मोठ्या प्रमाणावर फायबर असते.त्यामुळे ते आपल्याला खूप काळ भूक लागू देत नाहीत. तसेच मेथीदाण्यांचा डाएटमध्ये समावेश केल्याने ब्लड शुगर लेव्हलदेखील कंट्रोलमध्ये राहते.

# माणगावात गणरायाला भावपूर्ण निरोप

## पुढच्या वर्षी लवकर या...च्या घोषणांनी शहर दणाणले; ढोल-ताशा, लेझीमचा गजर





**माणगाव : प्रतिनिधी**

सर्वांचेच आराध्य दैवत असलेल्या लाडक्या गणरायाच्या आगमनाने भक्तिमय झालेल्या माणगाव परिसरात दीड दिवसाच्या गणपतींच्या विसर्जनाने भावनिक वातावरण निर्माण झाले. 'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या', 'गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला' अशा घोषणांनी माणगाव परिसर अक्षरशः दणाणून गेला. भक्तिमय वातावरणात, ढोल-ताशांचा गजर आणि लेझीमच्या तालावर नाचत गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

माणगाव तालुक्यात यंदा तब्बल २ हजार ५०६ दीड दिवसांच्या गणपतींची स्थापना करण्यात आली होती. विसर्जनाच्या दिवशी विविध ठिकाणी गणेशभक्तांनी पारंपरिक पद्धतीने मिरवणुका काढत गणरायाला निरोप दिला. माणगाव नगरपंचायतीचे नगरसेवक अजित तारलेकर व त्यांची पत्नी अ‍ॅडवोकेट मयुरा तारलेकर हे स्वतः उपस्थित राहून येणाऱ्या गणेश भक्तांना श्रीफळ देऊन स्वागत करीत होते. तसेच तारलेकर हे स्वतः पाण्यात उतरून गणपतीचे विसर्जन करीत होते. यांच्या प्रभाग क्रमांक १२ मधील गणपती विसर्जन घाटावरही दीड दिवसाच्या गणपतींचे मोठ्या संख्येने विसर्जन करण्यात आले.

माणगाव मुख्य बाजारपेठेतील गुजराती समाजाच्या गणपतीची भव्य विसर्जन मिरवणूक विशेष आकर्षण ठरली. फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि लेझीमच्या तालावर महिला व पुरुष गणेशभक्तांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यात मनीष मेहता, अ‍ॅड. केदार गांधी, सिद्धांत देसाई, सचिन देसाई, गीतेश गांधी, कांतीलाल मेथा, सुभाष मेथा यांच्यासह अनेक समाजाचे महिला-पुरुष या मिरवणुकीमध्ये मोठ्या उत्साही वातावरणात सहभागी झाले होते. यावेळी महिला व पुरुषांनी ढोल ताशाच्या तालावर लेझीमचा ठेका धरला होता.

'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात निघालेली ही मिरवणूक काळ नदीच्या किनारी असलेल्या गणपती विसर्जन घाटावर पोहोचली. तेथे भक्तांनी अत्यंत भावूक वातावरणात आपल्या लाडक्या बाप्पाला आरती करून जयघोशाच्या निनादात निरोप दिला. विसर्जन घाटावर गणेशभक्तांची मोठी गर्दी झाल्याने नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी विशेष खबरदारी घेतली. गणेशमूर्तींचे विसर्जन सुरक्षितपणे व्हावे, यासाठी कर्मचारी नदीपात्रातील पाण्यात उतरून भक्तांना मदतीचा हात देत होते.

त्यामुळे विसर्जनाची प्रक्रिया सुरळीत पार पडण्यास मदत झाली. दीड दिवसांच्या उत्सवानंतर बाप्पाला निरोप देताना अनेक गणेशभक्तांच्या चेहऱ्यावर आनंदासोबतच विरहाची भावनाही स्पष्ट दिसत होती. 'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या' या विनवणीच्या सादेने वातावरण भावूक झाले होते. बाप्पाच्या जयघोषाने परिसर भारावून गेला आणि भक्तांनी पुढील वर्षी गणरायाचे लवकर आगमन व्हावे, अशी मनोभावे प्रार्थना केली. दरम्यानच्या काळात माणगाव बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# मुरुडमध्ये १२१५ बाप्पांचे विसर्जन

**मुरुड : प्रतिनिधी**

'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात मुरुड शहर व परिसरातील दीड दिवसांच्या तब्बल १२१५ गणपती बाप्पांचे भक्तीभावाने विसर्जन करण्यात आले, अशी माहिती पोलीस पाटील मकरंद पाटील यांनी दिली.

सायंकाळपासूनच विसर्जन स्थळी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. ढोल-ताशांचा गजर, भजन-कीर्तन आणि फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. अनेक भाविकांनी चारचाकी, रिक्षा, हातगाडीतून तर काहींनी डोक्यावरून पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढत लाडक्या बाप्पाला निरोप दिला.

घरगुती गणपतींसोबतच काही सार्वजनिक मंडळांच्या गणपतींचेही विसर्जन करण्यात आले. विसर्जन सोहळा शांततेत आणि सुरळीत पार पडावा यासाठी पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

समुद्रकिनारी, बाजारपेठ, मारुती नाका, परेश नाका तसेच गर्दीच्या ठिकाणी मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत राहावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी वाहतूक पोलीस नाईक किशोर बठारे यांनी विशेष खबरदारी घेतली. सर्व गणेशभक्तांचे सहकार्य लाभल्याने विसर्जन उत्साहात आणि शांततेत पार पडले.







श्रीवर्धन : श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर दीड दिवसांच्या गणपती बाप्पांना भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. (छाया : अमेय नाझरे)



पेण : नगरपरिषदेच्या गणरायाचे दर्शन घेताना नगराध्यक्ष प्रितम पाटील, युवा नेते ललित पाटील, सभापती कलावती पाटील, नगरसेवक अजय क्षीरसागर आदींसह नगर परिषद कर्मचारी.



माणगाव : नगरपंचायतीचे पाणी पुरवठा सभापती अजित चंद्रकांत तारलेकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय.



मुरुड : रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराय.



खोपोली : खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या गणरायाचे दर्शन घेतले.



नगरसेवक राजेश मेहता यांच्या निवासस्थानी स्थानापन्न गणराय.



माणगाव येथील व्यापारी संतोष गोविंद मेथा यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय.



खोपोली : खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या गणरायाचे दर्शन खोपोली मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी घेतले. यावेळी ज्येष्ठ उद्योजक यशवंत साबळे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे व अन्य मान्यवर उपस्थित होते.



चौक : भाजप युवा मोर्चा चौक जिल्हा परिषद माजी अध्यक्ष दर्शन अनंत पोळेकर यांच्या घरी केदारनाथ देखावा करण्यात आला आहे.


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**Ramsheth Thakur Public School, Kharghar & Ramsheth Thakur Public School, Ulwe**

**STAFF RECRUITMENT FOR THE ACADEMIC YEAR 2026-2027**

**Applications are invited for the following positions for the Academic Year 2025-2026 for immediate appointment**

| Post | Qualification |
|---|---|
| (PRT) MATHS (1) | B.Sc. (Mathematics) & B.Ed. (With minimum 50% Marks) |
| **Vacany at Ramsheth Thakur Public School, Ulwe** | |
| (TGT) English (1) | M.A./B.A. (English) & B.Ed. (with Minimum 50% Marks) |
| (PRT) Marathi (1) | B.A. (Marathi) & B.Ed. (With Minimum 50% Marks) |
| Only those candidates who have passed STD - X from an English medium School should apply. | |

**Note :** Interested candidates please email your resume with the covering letter to **rtpskhgr@gmail.com** or **WhatsApp on 9987077043.**

**The last date for submissions is 3 days after the date of Advertisement.**

**For additional information Contact :- 9821537023**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel



**महाराष्ट्र शासन**
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
ई-निविदा सूचना - सन २०२६-२७

- कामाचे नाव: - "पनवेल (प.), नवी मुंबई येथे महाराष्ट्र नगर विकास संकुलाच्या बांधकामासाठी वास्तुशास्त्रीय व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) सेवा पुरविणे."
- ई-निविदा सूचनेबाबतची माहिती, निविदा दस्तऐवज तसेच इतर अनुषंगिक माहिती इत्यादी https://mahatenders.gov.in/ तसेच https://mahadma.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळांवर उपलब्ध असेल.

सही/-
(संजय काकडे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी२८३२



# रोहा अष्टमी नगर परिषद

ता.रोहा, जिल्हा रायगड
पिन कोड - 402109.
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/बांध/ई-निविदा सुचना/1580/2026 दिनांक:- 11/09/2026

**जाहिर ई-निविदा सूचना**

रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणा-या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई-निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल.

| क्र. | कामाचा तपशिल | बयाना रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|
| १ | राज्याने नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावयाचा मोटार वाहन कराचा अभिहस्तांकित रकमा -रस्ता अनुदान (अनिवार्य) योजनेअंतर्गत विविध रस्त्यांची कामे करणे | 1,72,563/- | 5000/- |

सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 16/09/2026 ते 24/09/2026 या कालावधीत उपलब्ध होईल.

सही/-
(अजयकुमार एडके)
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद

सही/-
(कु.वनश्री अवनी समीर शेडगे)
नगराध्यक्षा
रोहा अष्टमी नगर परिषद


मंगेश पिलविळकर, पनवेल


अनिल विष्णू राऊत, कोपरखैरणे


अशोक गणा शेळके, मा. नगरसेवक, नवीन पनवेल


आस्था मंदार शेळके, नेवाळी


देवानंद म्हात्रे, वशेणी-उरण


के. जी. म्हात्रे यांच्या घरी आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्रींचे दर्शन घेतले, त्यांच्या सोबत पनवेल महानगर पालिकेचे महापौर नितीन पाटील, जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, नगरसेवक परेश ठाकूर, सुमित झुंजारराव.


मिताली विशाल वाघिलकर, पनवेल


हरीभाऊ देशमुख, पनवेल


डॉ. संतोष जाधव, पनवेल


जितेंद्र म्हात्रे, कामोठे


शैलेश रमेश जगताप
पनवेल तालुका सचिव : भाजपा वाहतूक सेल


द्वारकादास शामकुमार, पनवेल


शशिकांत मुंबईकर, वेश्वी



पत्रकार मयूर तांबडे, नेरे




पनवेल : भाजप पळस्पे विभाग अध्यक्ष अनेश ढवळे यांनी पळस्पे जि.प विभागात शिवकर, पळस्पे, बोरले, चिखले व सुकापूर येथे कार्यकर्त्यांसह गणेश दर्शन घेतले.





अशोक मोते , खारघर

# युआयडीएआयकडून अलिबाग येथे नवीन आधार सेवा केंद्राचे उद्घाटन



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यामध्ये गणेशोत्सव विसर्जन मिरवणूका शांततामय वातावरणात पार पाडल्या जाव्यात, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये तसेच मिरवणूकांमध्ये नागरीकांच्या व मिरवणूकीकरीता नेमण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे डोळ्यांच्या सुरक्षेसाठी लेझर लाईटचा वापर कटाक्षाने टाळणे आवश्यक आहे. यासाठी रायगड जिल्हयात पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रामध्ये गणेशोत्सव जन मिरवणूका शांततेत पार पाडण्यात आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून तसेच नागरीकांच्या आरोग्याचे दृष्टीने दि.१९ सप्टेंबर २०२६ व दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी श्री गणेश विर्सजनाचे मिरवणूकीमध्ये डॉल्बी/डीजे साऊंड सिस्टीम, तीव्र क्षमतेचे लेझर बीम लाईटस, स्नो स्प्रे आणि केमिकल स्प्रे यांचा वापर करण्यास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रतिबंधात्मक अधिसूचना जारी केली आहे.

राज्यात सर्वत्र गणेशोत्सव साजरा होणार असून दि. १९/०९/२०२६ (सहावा दिवस), दि.२५/०९/२०२६ (अनंत चर्तुदशी) या दिवशी श्री गणेशाचे विर्सजन होणार आहे. श्री गणेशाचे आगमन तसेच विर्सजनावेळी मिरवणूकीमध्ये ठिकठिकाणी डॉल्बी साऊंड सिस्टीम/ स्नो स्प्रे, हिट स्प्रे/ लेझर बीम लाईटसचा वापर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाव्दारे केला जातो. श्री गणेश विर्सजन मिरवणूकीत ध्वनीक्षेपकांच्या दणदणाटामुळे काही नागरीकांना बहिरेपणाची समस्या तसेच काहींना हृदय विकाराचे झटके आल्याच्याही घटना घडल्या आहेत. तसेच श्री गणेश विर्सजन मिरवणूकीत लेझर लाईटमुळे डोळ्यांना इजा झाल्याचे प्रकार घडले आहेत. लेझर बीम लाईटमुळे नागरीकांचे तसेच मिरवणूक बंदोबस्ताकरीता नेमण्यात आलेल्या अधिकारी/अंमलदारांचे आरोग्याचे प्रश्न उपस्थित झाल्याचे निर्दशनास आले आहे.

या आदेशाचा भंग करुन गणपती विर्सजनाचे मिरवणूकीमध्ये डॉल्बी/डीजे साऊंड सिस्टीम, तीव्र क्षमतेचे लेझर बीम लाईटस, स्नो स्प्रे आणि केमिकल स्प्रे यांचा वापर करताना आढळून आल्यास अशी व्यक्ती/संस्था/मंडळ/संचालक हे भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ प्रमाणे दंडनीय कारवाईस पात्र राहतील.

# रोह्यातून १७ वर्षीय मुलगा बेपत्ता; मध्यरात्री घरातून गायब

**नागोठणे : बातमीदार**

रोहा शहरातील दमखाडी परिसरातून १७ वर्षाचा आर्या सत्यवीर चौधरी हा मुलगा ९ सप्टेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी त्याची आई अश्विनी सत्यवीर चौधरी यांनी रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, रोहा पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, चौधरी कुटुंबीय दमखाडी येथील जयराम बिल्डिंगमध्ये भाडेतत्त्वावर वास्तव्यास आहेत. दिनांक ९ सप्टेंबर रोजी रात्री कुटुंबीयांनी जेवण करून झोप घेतली. त्यानंतर रात्री सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास आई अश्विनी चौधरी यांना जाग आली असता मुलगा आर्या घरात दिसून आला नाही.

कुटुंबीयांनी त्याच्याशी मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचे दोन्ही मोबाईल क्रमांक बंद असल्याचे आढळून आले. त्यानंतर कुटुंबीयांनी परिसरात तसेच आर्याचे मित्र व नातेवाईकांकडे चौकशी करून त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा ठावठिकाणा लागला नाही.

आर्या हा १७ वर्षे ११ महिन्यांचा असून त्याची उंची सुमारे १६७ सेंटीमीटर, रंग गोरा, चेहरा गोल, केस व डोळे काळे आहेत. बेपत्ता होताना त्याने हिरव्या रंगाचा फुल शर्ट, खाकी रंगाची पँट आणि पावसाळी बूट परिधान केले होते. त्याच्याकडे आयफोन-१५ मोबाईल असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले आहे.

आर्याचा कोणास काही ठावठिकाणा अथवा माहिती मिळाल्यास रोहा पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन रोहा पोलिसांनी केले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास रोहा पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा पोलीस करीत आहेत.

# हाळ दर्गाजवळ कार पुलाखाली कोसळली, ३ जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई पुणे महामार्गावर हॉटेल बागेश्री जवळील हाळ दर्गा ब्रिज जवळ कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने पुलाचा कठडा तोडून ५० फुट खोल नदी पात्रात कोसळली. सुदैवाने नदी पात्रात पाणी असल्याने कोणालाही गंभीर दुखापती झाल्या नाहीत. घटनास्थळी खालापूर पोलीस व सामाजिक कार्यकर्ते तात्काळ दाखल झाले. पूला खालून तीन जणांना घटनास्थळावरून बाहेर काढून खोपोली नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. पेशंटचे नाव साहिल रेहमत शेख, हुजेफ शेख , रा खोपोली (कृष्णा नगर ) असे असून एका जखमीचे नाव समजू शकले नाही.

ही घटना मंगळवारी सकाळी ७ वा सुमारास घडली. पुलाखाली कोसळलेली गाडी बाहेर काढण्यात आली.



# विर्सजन मिरवणुकीमध्ये डीजे, लेझर बीम लाईट्स, स्नो स्प्रेचा वापर करण्यास प्रतिबंधात्मक अधिसूचना जारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हयामध्ये गणेशोत्सव विसर्जन मिरवणूका शांततामय वातावरणात पार पाडल्या जाव्यात, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये तसेच मिरवणूकांमध्ये नागरीकांच्या व मिरवणूकीकरीता नेमण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे डोळ्यांच्या सुरक्षेसाठी लेझर लाईटचा वापर कटाक्षाने टाळणे आवश्यक आहे. यासाठी रायगड जिल्हयात पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रामध्ये गणेशोत्सव जन मिरवणूका शांततेत पार पाडण्यात आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून तसेच नागरीकांच्या आरोग्याचे दृष्टीने दि.१९ सप्टेंबर २०२६ व दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी श्री गणेश विर्सजनाचे मिरवणूकीमध्ये डॉल्बी/डीजे साऊंड सिस्टीम, तीव्र क्षमतेचे लेझर बीम लाईटस, स्नो स्प्रे आणि केमिकल स्प्रे यांचा वापर करण्यास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रतिबंधात्मक अधिसूचना जारी केली आहे.

राज्यात सर्वत्र गणेशोत्सव साजरा होणार असून दि. १९/०९/२०२६ (सहावा दिवस), दि.२५/०९/२०२६ (अनंत चर्तुदशी) या दिवशी श्री गणेशाचे विर्सजन होणार आहे. श्री गणेशाचे आगमन तसेच विर्सजनावेळी मिरवणूकीमध्ये ठिकठिकाणी डॉल्बी साऊंड सिस्टीम/ स्नो स्प्रे, हिट स्प्रे/ लेझर बीम लाईटसचा वापर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाव्दारे केला जातो. श्री गणेश विर्सजन मिरवणूकीत ध्वनीक्षेपकांच्या दणदणाटामुळे काही नागरीकांना बहिरेपणाची समस्या तसेच काहींना हृदय विकाराचे झटके आल्याच्याही घटना घडल्या आहेत. तसेच श्री गणेश विर्सजन मिरवणूकीत लेझर लाईटमुळे डोळ्यांना इजा झाल्याचे प्रकार घडले आहेत. लेझर बीम लाईटमुळे नागरीकांचे तसेच मिरवणूक बंदोबस्ताकरीता नेमण्यात आलेल्या अधिकारी/अंमलदारांचे आरोग्याचे प्रश्न उपस्थित झाल्याचे निर्दशनास आले आहे.

या आदेशाचा भंग करुन गणपती विर्सजनाचे मिरवणूकीमध्ये डॉल्बी/डीजे साऊंड सिस्टीम, तीव्र क्षमतेचे लेझर बीम लाईटस, स्नो स्प्रे आणि केमिकल स्प्रे यांचा वापर करताना आढळून आल्यास अशी व्यक्ती/संस्था/मंडळ/संचालक हे भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ प्रमाणे दंडनीय कारवाईस पात्र राहतील.

# मुरुड पोलीस ठाण्यामार्फत रूट मार्चचे आयोजन



**मुरुड : प्रतिनिधी**

आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासोबतच हुल्लडबाज व समाजकंटकांमध्ये पोलिसांचा व कायद्याचा धाक निर्माण व्हावा यासाठी पोलिसांतर्फे रूट मार्च व फ्लॅग मार्चचे आयोजन करण्यात आले आहे. मुरुड पोलीस स्टेशन हद्दीत गणेशोत्सव २०२६ सणाच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी व कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या नेतृत्वाखाली रूट मार्च चे आयोजन करण्यात आले होते. एकदरा पूल येथून सुरु करून - श्रीराम बँक - बाजारपेठ मशीद - पूरकर नाका - नगरपरिषद - मसाल गल्ली - गोल बंगला कॉर्नर - पेठ मोहल्ला मशीद - लक्ष्मीखार - दस्तुरी नाका या भागात रूट मार्च करण्यात आले.त्याच प्रमाणे नांदगाव गावात सुधा रूट मार्च करण्यात आले आहे. रूट मार्च करण्याकरिता मुरुड पोलीस ठाणे कडील ०५ अधिकारी, ३६ अंमलदार, एसआरपीएफ प्लाटूनचे १ अधिकारी ,२२ अंमलदार व १० होमगार्ड असा मोठ्या प्रमाणात बंदोबस्त लावण्यात आला होता. यावेळी मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी आम जनतेला आव्हान केले की, गौरी गणपती सण सर्वांनी उत्सवात व शांततेत साजरा केला जावा.

# विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली; कापडी पिशव्यांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त समाजनिर्मिती तसेच विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साधनांच्या योग्य व मर्यादित वापराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट आणि पिल्लई महाविद्यालय, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, रसायनी-मोहोपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा येथे विविध जनजागृतीपर उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.




जिल्हा परिषद केंद्र शाळा, मोहोपाडा येथे विद्यार्थ्यांना प्लास्टिकच्या अतिवापरामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम, प्लास्टिक बंदीचे महत्त्व तसेच पर्यावरणपूरक जीवनशैली याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर टीव्ही, इंटरनेट आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक व शैक्षणिक दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. डिजिटल साधनांचा योग्य, सुरक्षित आणि मर्यादित वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि पर्यावरण तसेच डिजिटल माध्यमांच्या योग्य वापराबाबत अधिक माहिती मिळावी, या उद्देशाने संदर्भ ग्रंथांचे वाटप करण्यात आले. तसेच प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यासाठी विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

यानंतर मोहोपाडा बाजारपेठेत प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती अभियान राबविण्यात आले. दुकानदार, व्यापारी आणि नागरिकांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी नागरिक व दुकानदारांना कापडी पिशव्यांचे वाटप करून "प्लास्टिक पिशवी नको, कापडी पिशवी वापरा" हा पर्यावरणपूरक संदेश देण्यात आला.

दरम्यान, विद्यार्थ्यांनी मोहोपाडा बाजारपेठेतून जनजागृती रॅली काढून पर्यावरण संवर्धन आणि डिजिटल व्यसनाविरोधात घोषणाबाजी केली."प्लास्टिकला नकार कापडी पिशवीचा स्वीकार!""मोबाईलचा योग्य वापर करा डिजिटल व्यसनापासून दूर राहा!""स्वच्छ पर्यावरण, निरोगी समाज आणि जबाबदार डिजिटल वापर हीच काळाची गरज!"अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. प्लास्टिकमुक्त व पर्यावरणपूरक मोहोपाडा घडविण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या उपक्रमास पिल्लई महाविद्यालयाचे मार्केटिंग मॅनेजर गणेश शिंदे, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गोविंद जाधव, अफसाना खान, शिक्षिका अनिता म्हात्रे, तसेच राष्ट्रीय सेवा योजना (NSS) चे विद्यार्थी, जिल्हा परिषद केंद्र शाळा मोहोपाडा येथील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# फॉर्च्यून सिटीच्या बांधकाम साईटवरील चोरीचा छडा; रसायनी पोलिसांची कारवाई

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीजवळील भोकरपाडा येथील हिरानंदानी फॉर्च्यून सिटीच्या बांधकाम साईटवरून सुमारे ५० सेंट्रिंग प्लेट्स तसेच ॲल्युमिनियम प्लेट्स चोरीला गेल्याची घटना घडली होती. चोरी झालेल्या साहित्याची अंदाजे किंमत अडीच लाख रुपये असल्याचे समोर आले होते. याप्रकरणी रोहित जाधव यांनी रसायनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तक्रार दाखल होताच रसायनी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत तांत्रिक तपासाच्या आधारे चोरट्यांचा शोध सुरू केला. पोलिसांनी कौशल्याने तपास करत अवघ्या काही वेळातच चोरीचा छडा लावत सहा आरोपींना जेरबंद केले. तसेच चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमालही पोलिसांनी जप्त केला आहे.अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मोहन हेमला पवार (रा. वावेघर), राजू विनायक शिंदे (रा. वावेघर), रवी सोमू चव्हाण (रा. वावेघर), प्रिन्स पासवान (रा. मोहोपाडा), खरपत नडदेव गुप्ता (रा. वावेघर) तसेच भंगार विक्रेता सोमनाथ खरपत गुप्ता (रा. वावेघर) यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

रसायनी पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे बांधकाम साईटवरून साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असून, चोरीचा मुद्देमाल परत मिळाल्याने संबंधितांकडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे.ही कारवाई रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक फौजदार लालासाहेब कोळेकर हे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# रोहा तालुक्यात लाडक्या बाप्पाचे जल्लोषात आगमन

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात आपल्या लाडक्या गणरायाचे आगमन जल्लोषात झाले आहे. शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पाश्चिमात्य वाद्यासह पारंपारिक खालु बाजाच्या वाद्यावर मिरवणुक काढीत गणरायाला आपल्या घरी आणण्यात आले.

रोहा तालुक्यात सोमवारी एक गाव, एक कुटुंब ,एक गणपती असलेल्या देशमुख तरुण मंडळ पिंगळसईचा गणपती वाजत गाजत आणण्यात आला. तर दुसरीकडे शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात आपल्याकडे असलेल्या दुचाकी, चारचाकी, रिक्षा, टेम्पो, व डोक्यावरुन गणपती आपल्या घरी घेऊन जात होते.

गणपती अगमनाने संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले. बाल गोपाळासह वयोवृद्धा पर्यंत गणपती गजर सर्वत्र दिसून येत होता.





**खोपोली :** खोपोली शहरातील वासरंग पाताळगंगा नदीच्या तीरावर दीड दिवसांच्या श्री गणेशाचे विधिवत विसर्जन करण्यात आले. भाविकांनी मोठ्या प्रमाणात यात सहभाग घेतला.

